- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५८,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,५६,३५० /-
✔ चांदी : २,७८,३००/-

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivruttа@gmail.com | दिनांक : शनिवार, २६ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २८७ | किंमत : २ रूपये

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# पुढच्या वर्षी लवकर...! म्हणत भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप

## अकरा दिवसात नागपुरात २६ हजार ५३५ श्री गणेश मूर्तींचे विसर्जन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
गणपती बाप्पा मोरया...पुढच्या वर्षी लवकर... या जय घोषात श्री गणरायाचे विसर्जन झाले. श्री गणरायाच्या विसर्जनासाठी मनपाद्वारे शहरातील दहाही झोनसह गोरेवाडा कृत्रिम जलकुंड, पोलीस लाईन टाकळी, सरदार वल्लभभाई पटेल कच्छीविसा मैदान आणि कोराडी येथे विशेष सोय करण्यात आली. श्रींच्या विसर्जनासाठी येणाऱ्या भक्तांना विसर्जन स्थळी कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याकरिता मनपाद्वारे उत्तम व्यवस्था करण्यात आली.

महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, विरोधीपक्ष नेते संजय महाकाळकर, मनपा आयुक्त डॉ.विपीन, वैद्यकीय आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे यांच्यासह इतर सर्व झोन सभापती, अधिकारी व कर्मचारी यांच्या नेतृत्वात बाप्पांच्या पर्यावरणपूरक निरोपासाठी मनपाने जय्यत तयारी करण्यात आली. पहिल्या दिवसापासून तर अकराव्या दिवसापर्यंत शहरातील सर्व विसर्जन कुंडांवर २६ हजार ५३५ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

शहरात पर्यावरणपूरक गणेश मूर्ती विसर्जनासाठी दहाही झोन अंतर्गत विविध ठिकाणी ४६५ कृत्रिम हौद तयार करण्यात आले. यात घरच्या श्रीगणेश मूतीर्चे विसर्जन करण्यासाठी नागरिकांनी मनपाच्या कृत्रिम तलावांचा मोठ्या प्रमाणात वापर केला. या कृत्रिम तलावांमध्ये मागील अकरा दिवसात २५ हजार २७६ मातीच्या व १ हजार ५९ पीओपीच्या अशा एकूण २६ हजार ५३५ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. विशेष म्हणजे, नागरिकांना घराजवळच्या कृत्रिम तलावांची माहिती सहज उपलब्ध



व्हावी याकरिता मनपाद्वारे क्यूआर कोड आणि संकेतस्थळाची सोय उपलब्ध करून दिली.

**मनपा आयुक्त यांच्यासह पोलिस आयुक्त यांची पाहणी**

मनपा प्रशासन आणि पोलिस प्रशासन यांनी केलेल्या व्यवस्थेची पोलीस आयुक्त श्री विश्वास नांगरे पाटील आणि मनपाचे आयुक्त डॉ.विपिन यांनी पाहणी केली. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेंद्र दाभाडे,पोलीस उपायुक्त श्रीमती अन्नपूर्णा सिंग, मनपाचे उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता राजेंद्र राठोड यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विसर्जनस्थळे आणि प्रमुख मार्गांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला.

**श्री गणेश मूर्तींचे झोननिहाय विसर्जन**

लक्ष्मीनगर झोनमध्ये ४१ कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून, दहाव्या दिवशी ६ हजार ३५ मातीच्या तर १६३ पीओपीच्या अशा एकूण ६ हजार १९८ श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. धरमपेठ झोनमध्ये ६४ कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली असून, येथे ५ हजार ३३२ मातीच्या तर पीओपीच्या ३८९ अशा एकूण ५ हजार ७२१ मूर्तींचे विसर्जन झाले. हनुमाननगर झोनमध्ये ६० कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून येथे ४ हजार ५२५ मातीच्या तर १२९ पीओपीच्या अशा एकूण ४ हजार ६५४ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. धंतोली झोनमध्ये ३१ कृत्रिम तलावांमध्ये २ हजार १२ मातीच्या तर २३ पीओपीच्या अशा एकूण २ हजार २४२ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. नेहरूनगर झोनमध्ये ६८ कृत्रिम तलावांची व्यवस्था असून येथे १ हजार ९८२ मातीच्या तर १७५ पीओपीच्या अशा एकूण २ हजार १५७ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. गांधीबाग झोनमध्ये ६८ कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून येथे ६०२ मातीच्या आणि १८





पीओपीच्या अशा एकूण ६२० मूर्तींचे विसर्जन झाले. सतरंजीपुरा झोनमध्ये २८ कृत्रिम तलाव उभारण्यात आले आहे.येथे १ हजार ८३० मातीच्या आणि ३२ पीओपीच्या अशा एकूण १ हजार ८६२ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. लकडगंज झोनमध्ये ४२ कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून येथे १ हजार ७०० मातीच्या आणि ९२ पीओपीच्या अशा एकूण १ हजार ७९२ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. आशीनगर झोनमध्ये २५ कृत्रिम तलावामध्ये २०२ मातीच्या आणि २८ पीओपीच्या अशा एकूण २३० मूर्तींचे, तर मंगळवारी झोनमधील ३४ कृत्रिम तलावांमध्ये ८५० मातीच्या आणि ३ पीओपीच्या अश्या एकूण ८५३ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. या सोबत पोलीस लाईन टाकळी येथे १७५ मातीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. गोरेवाडा रिंग रोड जलकुंड येथे ३ मातीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. आणि कोरडी जलकुंड येथे २८ मातीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. तसेच्या सरदार वल्लभभाई पटेल (कच्छीविसा) मैदान येथे १ कृत्रिम जलकुंड उभारण्यात आले आहे.

लकडगंज भागातील सरदार वल्लभभाई पटेल मैदान कच्छीविसा येथील कृत्रिम तलावात अनंत चतुर्दशीला गणेशभक्तांनी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर अशा घोषणा देत श्री. गणेशाला भावपूर्ण निरोप देत पर्यावरणपूरक कृत्रिम तलावांमध्ये ढोल ताशांच्या गजरात विसर्जन केले. सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या मार्गदर्शनात व सद्भावना सांस्कृतिक क्रीडा मंडळ व बहु. संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने अत्यंत सुलभपणे रात्री



उशिरापर्यंत श्री. गणेशाच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी विविध संस्थाच्या युवकांनी ढोलताशे व लेझिम खेळाचे चित्तथरारक प्रदर्शन केले.

**१ हजार पेक्षा अधिक मनुष्यबळ**

शहरातील गणेशोत्सवांनंतर श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन पर्यावरणपूरक करण्याच्या अनुषंगाने मनपाद्वारे उभारण्यात आलेल्या ४६५ कृत्रिम तलावांच्या स्वच्छतेसाठी, परिसरातील स्वच्छतेसाठी तसेच कृत्रिम तलावांवर मूर्तीच्या विसर्जनाकरिता येणाऱ्या नागरिकांच्या सुयोग्य व्यवस्था आणि सुविधांसाठी मनपाद्वारे मोठ्या संख्येने मनुष्यबळ नेमून देण्यात आले. अकरा दिवसात शहरातील विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या विविध कृत्रिम तलावांवर मनपाने १ हजार ३४ कर्मचारी कर्तव्यावर होते.

**स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य**

गणपती विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावे यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी तसेच ग्रीन व्हीजील या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने कार्य सुरू आहे. सातव्या दिवशी मोठ्या संख्येने नागपूर शहरातील नागरिकांनी मनपाच्या या व्यवस्थेचा लाभ घेतला. मनपाचे स्वच्छता ब्रँड अँम्बेसेडर व ग्रीन व्हीजीलचे कौस्तुव चॅटर्जी, सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, प्रिया यादव, श्रिया जोगी, तुषार देशमुख यांच्यासह रीफ, रामदेवबाबा विद्यापीठ येथील हार्दिक अग्रवाल, अनुष्का गुरवे, हर्ष जोरा, अमेय शेंड्रे, कु. अवंती जोशी यांच्यासह अनेक स्वयंसेवी कार्यकर्ते पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाचे अभियान यशस्वीपणे राबवित आहेत.

**कच्छीविसा मैदानात व्यवस्था**

लकडगंज भागातील सरदार वल्लभभाई पटेल मैदान कच्छीविसा येथील कृत्रिम तलावात अनंत चतुर्दशीला गणेशभक्तांनी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर अशा घोषणा देत श्री. गणेशाला भावपूर्ण निरोप देत पर्यावरणपूरक कृत्रिम तलावांमध्ये ढोल ताशांच्या गजरात विसर्जन केले. सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या मार्गदर्शनात व सद्भावना सांस्कृतिक क्रीडा मंडळ व बहु. संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने अत्यंत सुलभपणे रात्री उशिरापर्यंत श्री. गणेशाच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी विविध संस्थाच्या युवकांनी ढोलताशे व लेझिम खेळाचे चित्तथरारक प्रदर्शन केले.

---

**थोडक्यात**

## जंतर मंतर २.० लवकरच होणार?

निवडणूक आयोग आणि एसआयआर बाबत झालेल्या सनसनाटी खुलाशानंतर आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांविरोधात देशव्यापी संतापाचा उद्रेक झाला आहे. आज काँग्रेसकडून देशव्यापी आंदोलन करण्यात आल्यानंतर जंतर मंतरवर ज्ञानेश कुमारांच्या अटकेच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. मात्र, या आंदोलनातून दिल्ली पोलिसांनी अनेकांना फरफटत नेत अटक केली आहे. राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव यांच्यासह नेहा बोरा यांनाही पोलिसांना ताब्यात घेत जंतर मंतर बंद केलं आहे. आंदोलनात मोठ्या संख्येने लोक जमले. दिल्ली पोलीसांकडून योगेंद्र यादव यांच्यासह ४० हून अधिक आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. प्रशांत भूषण, अंजली भारद्वाज आणि नेहा यांच्यासह विद्यार्थी आंदोलनासाठी जंतर मंतर येथे पोहोचले होते. दिल्ली पोलिसांनी त्यांना बॅरिकेड्सवर रोखले. दिल्ली पोलिसांनी जंतर मंतर येथे सर्व आंदोलकांना अटक करून संपूर्ण रस्ता मोकळा केला. त्यांना आंदोलनाच्या ठिकाणी जाऊ दिले नाही. त्यांना १५० मीटर अंतरावर थांबवून अटक करण्यात आली आणि तेथून परत पाठवण्यात आले.

---

## दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास मनाई, जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर जिल्ह्यासह राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, भूमी अभिलेख (मोजणी), महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा आणि जलसंधारण विभागातील अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय शिस्त, उपस्थिती आणि रजा मंजुरीबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी मार्गदर्शक सूचना आणि आदेश जारी केले आहेत.

नागपूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सद्यःस्थितीत दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून या शासन स्तरावरून कर्जमाफी, बियाणे व खते वाटप, पीक कर्ज पुनर्गठन तसेच विविध आर्थिक सवलतींची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ही परिस्थिती लक्षात घेता संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सतर्क व गतिमान ठेवण्यासाठी राज्यात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास आणि भूमी अभिलेख या विभागांतील जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय सर्व अधिकाऱ्यांनी मुख्यालयात पूर्णवेळ हजर राहून दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन व शेतकरी सहाय्याची कामे सर्वोच्च प्राधान्याने पार पाडावीत. पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे मूळ रजा मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी शासकीय नियमानुसार कोणीही असले, तरी सद्यःस्थितीतील दुष्काळी आणीबाणी संपेपर्यंत कोणतीही रजा (अतितातडीची स्वतःची वैद्यकीय रजा वगळता) केवळ जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या पूर्वपरवानगीनेच मंजूर केली जाईल.

अधिकाऱ्यांनी परस्पर अथवा आपल्या मूळ प्रशासकीय प्रमुखाकडून परस्पर रजा मंजूर करून मुख्यालयातून गैरहजर राहू नये. रजेचा अर्ज सबळ कारणांसह व संबंधित विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा लागेल. जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय रजेवर जाणाऱ्या, परस्पर रजा वाढवून घेणाऱ्या अथवा मुख्यालयात अनुपस्थित आढळणाऱ्या सर्व जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

---

## महाराष्ट्राला दुष्काळातून बाहेर काढो अशी गणरायाच्या चरणी प्रार्थना

### शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही : चंद्रशेखर बावनकुळे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
बारा दिवस मनोभावे सेवा केल्यानंतर महसूलमंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कोराडीतील निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे आज भावपूर्ण वातावरणात कोराडी तलावात विसर्जन करण्यात आले.

यावेळी त्यांनी महाराष्ट्रावर ओढवलेल्या दुष्काळसदृश परिस्थितीतून राज्याला बाहेर काढावे आणि शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना सुखी ठेवावे, अशी प्रार्थना गणरायाच्या चरणी केली.

यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले, गणपती बाप्पा हा विघ्नहर्ता आहे. सध्या महाराष्ट्रात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या संकटातून महाराष्ट्राला बाहेर काढावे, शेतकऱ्यांना बळ द्यावे आणि राज्य सुखी-समृद्ध ठेवावे, अशी प्रार्थना बाप्पाच्या चरणी केली आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीत राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,सुनेत्राताई पवार आणि मंत्रिमंडळातील सहकारी परिस्थितीची पाहणी करत असून प्रशासनाच्या माध्यमातून प्रत्येक बाबीची नोंद घेतली जात आहे. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. कुठेही चूक होऊ नये, कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी काळजी घेतली जात आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्यात आली असून या समितीच्या बैठका सातत्याने घेतल्या जात आहेत. परिस्थितीचा जिल्हानिहाय आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजनांबाबत निर्णय घेतले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरच यासंदर्भात शासन निर्णय (जीआर) काढण्याचे सांगितले असून त्यानंतर शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत देण्याच्या प्रक्रियेला गती मिळेल, असेही बावनकुळे म्हणाले. दुष्काळाच्या या परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. शेतकऱ्यांना पूर्ण ताकदीने मदत केली जाईल. पंचनामे, पाहणी आणि प्रशासनाकडून मिळणाऱ्या अहवालांच्या आधारे कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, दुष्काळसदृश परिस्थितीवरून विरोधकांकडून सुरू असलेल्या राजकारणावरही बावनकुळे यांनी नाराजी व्यक्त केली. अशा संकटाच्या काळात दुष्काळावर राजकारण करणे योग्य नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

---

## बँकांचा पाच दिवस 'वर्किंग डे'चा प्रस्ताव सरकारला मान्य?

### बँक कर्मचाऱ्यांकडून संपाचं हत्यार




**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
आयटी आणि रिझर्व्ह बँकेप्रमाणे बँकांमध्येही आठवड्यातून ५ दिवस काम लागू करण्याच्या बँक कर्मचाऱ्यांच्या मागणीला केंद्र सरकारने मोठा धक्का दिला आहे. बँकांसाठी ५ दिवसांचा आठवडा करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही आणि असा कोणताही शब्द सरकारकडून देण्यात आला नव्हता, असे अर्थ मंत्रालयाच्या सूत्रांनी स्पष्ट केले आहे. सरकारच्या या भूमिकेनंतर बँक कर्मचारी संघटना आक्रमक झाल्या असून त्यांनी २८ ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान ३ दिवसांच्या देशव्यापी संपाची घोषणा केली आहे.

'ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फेडरेशन'चे सरचिटणीस रूपम रॉय यांच्या दाव्यानुसार, मार्च २०२४ मध्ये 'इंडियन बँक्स असोसिएशन' आणि बँक युनियन्स यांच्यात झालेल्या १२ व्या द्विपक्षीय वेतन करारात ५ दिवसांच्या वर्क वीकवर सहमती झाली होती.प्रत्येक शनिवारी सुट्टी मिळण्याच्या बदल्यात बँक कर्मचाऱ्यांनी सोमवार ते शुक्रवार दररोज ४० मिनिटे अतिरिक्त काम करण्याची तयारी दर्शवली होती. IBA ने या प्रस्तावाला मंजुरी देऊन फाईल वित्त मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवली होती. मात्र, सरकारने यावर कोणतीही अधिकृत अधिसूचना जारी केली नाही.

बँक कर्मचाऱ्यांच्या दाव्याच्या उलट भूमिका घेत वित्त मंत्रालयाच्या वरिष्ठ सूत्रांनी सांगितले की, "आम्ही बँकांसाठी पाच दिवसांचा आठवडा करण्याचे कोणतेही आश्वासन दिले नव्हते. हा विषय कराराच्या चर्चेत कधी नव्हताच. ही मागणी केवळ कर्मचारी संघटनांकडून एकतर्फी करण्यात आली होती आणि सरकार व युनियन्स यांच्यात यावर कोणतीही अंतिम सहमती झालेली नव्हती." पाच दिवसांची बँकिंग लागू केल्यास देशातील छोटे व्यापारी, शेतकरी आणि सर्वसामान्य बँक ग्राहकांच्या सेवांवर विपरीत परिणाम होईल, असा सूर सरकारच्या बाजूने लावला जात आहे. केंद्र सरकारने मागणी फेटाळल्यामुळे 'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स' च्या नेतृत्वाखाली या तीन दिवसांत सरकारी बँकांमध्ये संप पुकारण्यात आला आहे.

संपाच्या काळात सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आरबीआयच्या सूचनेनुसार २७ सप्टेंबर रोजी (रविवारी) काही प्रमुख बँकांच्या शाखा चालू ठेवण्याचे नियोजन केले जात आहे. या संपकाळात बँक शाखांमधील काउंटरचे काम (चेक क्लिअरन्स, कॅश भरणे, काढणे) प्रभावित होईल. मात्र, यूपीआय, नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग आणि एटीएम सेवा सुरळीत सुरू राहतील.

वित्तीय वर्ष आणि सणासुदीच्या काळात तीन दिवसांचा संप झाल्याने देशभरातील कोट्यवधी रुपयांचे आर्थिक व्यवहार आणि चेक क्लिअरन्सची कामे खोळंबण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

संपादकीय लेखणीतून...

# कामगार शक्तीची प्रेरणा

नारायण मेघाजी लोखंडे यांच्या अथक परिश्रम आणि तीव्र इच्छाशक्ती व जिद्दीने ब्रिटीशकालीन भारतामध्ये पहिली गिरणी कामगार संघटना सन १८८४ मध्ये बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन या नावाने स्थापन झाली. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता अशिक्षीत, अज्ञानी व अप्रगत कामगार कष्टकरी वर्गाला एकत्र करुन त्यांच्यामध्ये हक्काची, कर्तव्याची जाणीव करून देऊन त्याचे रुपांतर एका संघटीत शक्तीत करणे, हे एक दिव्य कार्य त्यांच्या सहकाऱ्यांच्या साथीने घडवून आणले. एका व्यापक अथार्ने असंघटीतांना संघटीत करण्याचा हा एक यशस्वी प्रयोग तत्कालीन परिस्थितीत नारायण मेघाजी लोखंडे यांनी केला. पुढे पुढे कामगार शक्ती एकवटू लागली आणि कामगार चळवळ व्यापक होऊ लागली. कामगार चळवळीला एक दिशा मिळत गेली. पुढे विसाव्या शतकात अनेक कामगार संघटना उदयाला आल्या. त्यातून कामगारांचे हितसंबंध जपण्याचा व संवर्धनाचा प्रयत्न होऊ लागला. पण या सर्वांचे मूळ, हे नारायण मेघाजी लोखंडे यांच्या बॉम्बे मिल हँड्स असोसिएशनमध्ये दिसून येते. संघटना बांधण्याचे असे हे क्रांतीकारक पाऊल त्याकाळात नारायण मेघाजी लोखंडे यांनी उचलले. हे समग्र कामगार चळवळीच्या दृष्टीने ऐतिहासिक पाऊल होते. त्यामुळे नारायण मेघाजी लोखंडे हे भारताच्या कामगार चळवळीचे आद्य प्रवर्तक, प्रणेते म्हणून संबोधले जातात.

कामगार चळवळीतील चैतन्याचा महामेरु : नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार क्षेत्रातील योगदान म्हणजे ज्वलंत ऐतिहासिक कामगार चळवळ होय. त्यावर टाकलेला हा संक्षिप्त दृष्टिक्षेप - कापड गिरणीमध्ये नारायण मेघाजी लोखंडे स्वतः काम करीत असल्यामुळे तेथील अमानवी स्थितीची चीड त्यांच्या मनात खदखदत होती. याची ठिणगी म्हणजे स्वतः कापड गिरण्यांमध्ये जाऊन कामगारांना संघटीत करुन निर्माण केलेली बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन ही कामगारांच्या प्रचंड अशा उत्स्फूर्त प्रतिसादातून तयार झालेली देशातील पहिली कामगार संघटना. मुंबई सरकारने सन १८८१ च्या फॅक्टरी अँक्टमध्ये सुधारणा करण्यासाठी सन १८८४ मध्ये कलेक्टर डब्ल्यु. बी. मुलक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिशनला कामगारांच्या मागण्या सादर करता याव्यात यासाठी त्यांनी दोन ऐतिहासिक सभा घेतल्या. त्याचा उल्लेख याठिकाणी करणे अनिवार्य आहे. पहिली ऐतिहासिक जाहीर सभा नारायण मेघाजी लोखंडेंच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ सप्टेंबर १८८४ रोजी सायं. सुपारीबाग, परळ येथे सुमारे ४,००० कामगारांच्या उपस्थितीत पार पडली. लगेच दुसरी जाहीर सभा दिनांक २६ सप्टेंबर १८८४ रोजी भायखळा येथे घेण्यात आली. या सभेलाही कामगारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या दोन्ही सभांमध्ये कामगारांच्या मागण्यांचे ठराव संमत केले. ५,५०० कामगारांनी सह्या केलेले मागण्यांचे पिटिशन दिनांक १५ ऑक्टोबर, १८८४ रोजी फॅक्टरी कमिशनला सादर केले. त्यामध्ये प्रामुख्याने ५ मागण्या केल्या होत्या - १) गिरणी कामगारांना आठवडयातून एक दिवस रविवारी सुट्टी देण्यात यावी. २) दुपारी अधार्तास जेवणाची सुट्टी देण्यात यावी. ३) कामगारांची कामाची वेळ निश्चित करण्यात यावी. ४) कामगारांचा पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत देण्यात यावा. ५) कामावर असताना जर कुणाला गंभीर जखम झाली तर तो बरा होईपर्यंत पूर्ण पगार देण्यात यावा. जर कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला पेन्शन देण्यात यावी. परंतु या मागण्यांबाबत निर्णय लवकर होत नव्हता, म्हणून पुन्हा दिनांक २० नोव्हेंबर १८८९ रोजी साडेसहा हजार कामगारांनी सह्या केलेला अर्ज सरकारला सादर केला.

शेवटी तीव्र आंदोलन उभारावे लागले. दिनांक २४ एप्रिल, १८९० रोजी नारायण मेघाजी लोखंडे यांनी महालक्ष्मीच्या रेसकोर्स मैदानावर कामगारांची प्रचंड सभा आयोजित केली. सुमारे १०,००० कामगार या सभेला उपस्थित होते. विशेष म्हणजे दोन कामगार स्त्रियांनी या सभेत भाषणे करुन आपल्या व्यथा समाजापुढे मांडल्या. या घटनेला अनेक बाजूंनी महत्व होते. ही घटना म्हणजे लोखंडेंच्या कामगार चळवळीने समाजजागृतीचा एक टप्पा पूर्ण केल्याचे प्रतिक होते. तसेच, ब्रिटीश सरकार आणि मालक वर्गाच्या विवेकबुध्दीला केलेले ते आवाहन होते आणि विशेष म्हणजे बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशनने रविवार दिनांक १० जून १८९० रोजी कामगारांना दर रविवारी सुट्टी देण्याचा निर्णय जाहीर केला. हे त्या सभेचे फलित होते. यामुळे, भारताला रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळण्याचे कार्य पूर्ण झाले. समग्र भारतातील कष्टकरी शक्तीच्या एकजुटीने मिळविलेला हा पहिला महत्वपूर्ण विजय होता. हा विजय म्हणजे कामगार चळवळीचा आत्मविश्वास वाढीला लागून कामगार चळवळ अधिक सक्षम होण्यास व तिची व्याप्ती वाढण्यास कारणीभूत ठरला असे म्हटले तर वावगे ठरु नये.

# तुर्कीची कुरापत, भारताचे सडेतोड उत्तर !

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

संयुक्त राष्ट्र महासभेच्या एक्याऐंशीव्या अधिवेशनात जागतिक राजकारणातील अनेक महत्त्वाच्या घडामोडींवर चर्चा होत असतानाच, तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगन यांनी पुन्हा एकदा आपली जुनीच कुरापत उकरून काढली आहे. न्यूयॉर्क येथे २२ सप्टेंबर रोजी संपन्न झालेल्या महासभेच्या उच्चस्तरीय सत्रात, जागतिक शांततेचा आणि मानवाधिकारांचा खोटा आव आणत एर्दोगन यांनी जाणीवपूर्वक काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला. दक्षिण आशिया खंडामध्ये स्थैर्य आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी काश्मीर समस्येवर तोडगा काढणे अनिवार्य आहे, असे विधान त्यांनी केले.

आंतरराष्ट्रीय व्यासपीठाचा वापर करून पाकिस्तानची पाठराखण करण्यासाठी केलेल्या या विधानाला भारताने अत्यंत आक्रमक आणि खणखणीत शब्दांत चोख उत्तर दिले आहे. जागतिक मंचावर एका सार्वभौम देशाच्या अंतर्गत प्रश्नात नाक खुपसण्याच्या तुर्कीच्या या कृतीचा भारताने तीव्र निषेध नोंदवला असून, आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत भारताची वाढती ताकद आणि आक्रमक धोरण या निमित्ताने पुन्हा एकदा जगासमोर आले आहे.

एर्दोगन यांच्या या बेजबाबदार आणि प्रक्षोभक वक्तव्यानंतर भारताने आपला 'प्रत्युत्तराचा अधिकार' (राईट टू रिप्लाय) या विशेषाधिकाराचा अत्यंत प्रभावीपणे वापर केला. भारतीय प्रतिनिधींनी तुर्कीला त्यांच्या मर्यादेची कठोर शब्दांत जाणीव करून देत स्पष्ट केले की, जम्मू-काश्मीर आणि लडाख हा संपूर्ण भूभाग भारताचा अविभाज्य, अतूट आणि शाश्वत भाग होता, आहे आणि भविष्यातही राहील. या भौगोलिक आणि राजकीय सत्यावर भाष्य करण्याचा तुर्कीला कोणताही कायदेशीर, घटनात्मक किंवा नैतिक अधिकार नाही. भारताच्या निखळ अंतर्गत बाबींमध्ये ढवळाढवळ खपवून घेतली जाणार नाही, असे भारतीय प्रतिनिधींनी ठणकावून सांगितले. कोणत्याही राष्ट्राने भारताच्या सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर राखलाच पाहिजे आणि आपल्या राजकीय स्वाथार्साठी किंवा दुसऱ्या देशाच्या अजेंड्याला खतपाणी घालण्यासाठी संयुक्त राष्ट्रांसारख्या सर्वोच्च मंचाचा गैरवापर त्वरित थांबवावा, अशी सक्त ताकीद भारताकडून देण्यात आली.

तुर्कीने काश्मीरचा मुद्दा उपस्थित करण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. २०१९ मध्ये भारताने जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० आणि ३५-अ रद्द करून राज्याला मुख्य प्रवाहात आणण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. तेव्हापासूनच पाकिस्तानच्या सुरात सूर मिसळत एर्दोगन यांनी सातत्याने भारताविरोधी भूमिका घेतली आहे. स्वतःला इस्लामिक जगताचे स्वयंघोषित नेते म्हणून प्रस्थापित करण्याच्या एर्दोगन यांच्या महत्त्वाकांक्षेचा हा एक भाग मानला जातो. मात्र, काश्मीरचा प्रश्न हा संपूर्णतः द्विपक्षीय असून तो केवळ भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संवादातूनच आणि तोही शिमला कराराच्या चौकटीतच सुटू शकतो, यामध्ये कोणत्याही तिसऱ्या देशाच्या हस्तक्षेपाला अथवा आंतरराष्ट्रीय मध्यस्थीला तीळमात्र थारा दिला जाणार नाही, ही भारताची आजवरची आणि भविष्यातीलही ठाम भूमिका आहे, हे जागतिक समुदायाला निक्षून सांगण्यात आले.

या आक्षेपार्ह विधानाचे पडसाद केवळ संयुक्त राष्ट्रांच्या सभागृहापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर राजनैतिक आणि मुत्सद्दी पातळीवरही भारताने अत्यंत कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

भारताने तातडीने नवी दिल्लीतील तुर्कीच्या राजदूतांना पाचारण करून या बेजबाबदार वक्तव्याबद्दल आपला अधिकृत आणि तीव्र संताप नोंदवला आहे. एका सार्वभौम देशाच्या अंतर्गत बाबींमधील या अनावश्यक आणि अनाहूत हस्तक्षेपामुळे भारत आणि तुर्की यांच्यातील द्विपक्षीय, धोरणात्मक आणि व्यापारी संबंधांवर अत्यंत विपरीत परिणाम होऊ शकतो, याची स्पष्ट जाणीव तुर्कीला करून देण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या आणि भौगोलिक अखंडतेच्या मुद्यावर भारत कधीही, कोणाशीही आणि कोणत्याही दबावाखाली तडजोड करणार नाही, असा अत्यंत कणखर आणि स्पष्ट संदेश या संपूर्ण घडामोडीतून जगाला देण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचे हे आक्रमक प्रत्युत्तर एक महत्त्वाची नोंद ठरणार आहे.

- ९५६१५९४३०६

# आधुनिक मर्यादित षटकांच्या क्रिकेटचा शिल्पकार : जोस बटलर

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

इंग्लंडचा धडाकेबाज यष्टीरक्षक-फलंदाज जोस बटलरने लीड्सच्या मैदानावर एक नवा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. मर्यादित षटकांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये म्हणजेच एकदिवसीय आणि आंतरराष्ट्रीय टी-२० या दोन्ही प्रकारांत मिळून–१०,००० धावांचा टप्पा ओलांडणारा तो इंग्लंडचा पहिलाच फलंदाज ठरला आहे. या अद्वितीय यशामुळे इंग्लंडच्या क्रिकेट इतिहासातील सर्वकालीन महान व्हाईट-बॉल फलंदाज म्हणून त्याचा दर्जा अधिकच पक्का झाला आहे.

श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ३२२ धावांचा पाठलाग करताना बटलरने अवघ्या ४९ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि पाच गगनचुंबी षटकारांसह १४०.८२ च्या स्ट्राइक रेटने ६९ धावांची वादळी खेळी केली. दुखापतीमुळे त्याला डावादरम्यान निवृत्त व्हावे लागले असले, तरी मैदानावर असताना त्याने प्रेक्षकांचे पुरेपूर मनोरंजन केले आणि या ऐतिहासिक विक्रमाला गवसणी घातली.

**आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा सविस्तर प्रवास**

बटलरची क्रिकेट कारकीर्द केवळ आक्रमकतेपुरती मर्यादित नसून, तिन्ही फॉरमॅटमध्ये सातत्य राखण्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

एकदिवसीय क्रिकेटमधील दबदबा एकदिवसीय क्रिकेटमध्ये बटलरने आतापर्यंत २०४ सामन्यांतील १७६ डावांमध्ये फलंदाजी केली आहे. यात त्याने ३९.१५ च्या प्रभावी सरासरीने आणि ११५.५४ च्या झंझावाती स्ट्राइक रेटने एकूण ५,६७८ धावा केल्या आहेत. या फॉरमॅटमध्ये त्याच्या नावावर ११ शतके आणि ३० अर्धशतके नोंदवली गेली असून, नाबाद १६२ ही त्याची सर्वोत्तम वैयक्तिक धावसंख्या आहे. एकदिवसीय सामन्यांमध्ये इंग्लंडकडून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो सध्या तिसऱ्या स्थानावर विराजमान आहे.

टी-२० आंतरराष्ट्रीय मधील निर्विवाद वर्चस्व आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये बटलर हा इंग्लंडचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याने १६३ सामन्यांमधील १५० डावांत ३४.७९ च्या सरासरीने आणि १५०.१३ च्या स्फोटक स्ट्राइक रेटने ४,३८४ धावा फटकावल्या आहेत. या प्रकारात त्याने दोन शतके आणि ३० अर्धशतके झळकावली आहेत. डावाच्या सुरुवातीला आक्रमक पाया रचणे असो किंवा वेगाने धावांची गती वाढवणे असो, बटलरने टी-२० मध्ये आपली वेगळी छाप पाडली आहे.

व्हाईट-बॉल क्रिकेटचा एकत्रित विक्रम दोन्ही मर्यादित षटकांच्या फॉरमॅट्सचा विचार केल्यास, बटलरने ३६७ सामन्यांमधील ३२६ डावांमध्ये फलंदाजी करताना ३७.१२ च्या सरासरीने एकूण १०,०६२ धावांचा डोंगर उभा केला आहे. यामध्ये १३ शतके आणि ६० अर्धशतकांचा समावेश आहे. हा पराक्रम करणारा तो इंग्लंडच्या इतिहासातील पहिलाच फलंदाज ठरला आहे. कसोटी क्रिकेट आणि एकूण आंतरराष्ट्रीय कामगिरी लाल चेंडूच्या क्रिकेटमध्येही बटलरने ५७ कसोटी सामने खेळले असून, दोन शतके आणि १८ अर्धशतकांच्या जोरावर २,९०७ धावांचे योगदान दिले आहे.

तिन्ही आंतरराष्ट्रीय फॉरमॅट्स मिळून बटलरने ४२४ सामन्यांमधील ४२६ डावांत ३५.८२ च्या सरासरीने आणि ९८.२५ च्या स्ट्राइक रेटने एकूण १२,९६९ धावा केल्या आहेत. संपूर्ण आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्याच्या खात्यावर १५ शतके आणि ७८ अर्धशतके जमा आहेत.

**मैदानातील अष्टपैलू नेतृत्व आणि प्रभाव**

केवळ आकडेवारीच्या पलीकडे जाऊन पाहिले तर जोस बटलर हा आधुनिक क्रिकेटच्या शैलीत क्रांती घडवून आणणाऱ्या मोजक्या फलंदाजांपैकी एक आहे. मैदानाभोवती ३६०-डिग्री फटकेबाजी करण्याचे त्याचे कौशल्य प्रतिस्पर्धी गोलंदाजांसाठी नेहमीच डोकेदुखी ठरले आहे. एका बाजूला स्फोटक फलंदाजी करत असतानाच, दुसऱ्या बाजूला यष्टीरक्षणात चपळ हालचाली आणि मैदानात शांत डोक्याने निर्णय घेण्याची क्षमता यामुळे तो इंग्लंड संघाचा एक अविभाज्य आधारस्तंभ बनला आहे. लीड्समधील ही खेळी आणि १०,००० धावांचा टप्पा त्याच्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकिदीर्तील आणखी एक मानाचा तुरा ठरला आहे.

बटलरच्या कारकिर्दीत केवळ धावांचे आकडेच नव्हे, तर जागतिक क्रिकेटवर त्याचा प्रभाव पाडणारे अनेक ऐतिहासिक टप्पे, विश्वचषक विजय आणि महत्त्वाचे विक्रम नोंदवले गेले आहेतः

**विश्वचषक विजेतेपद आणि ऐतिहासिक क्षण**

२०१९ चा एकदिवसीय विश्वचषकः इंग्लंडने पहिल्यांदा जिंकलेल्या २०१९ च्या विश्वचषकात बटलर उपकर्णधार होता. फायनल सामन्यातील अखेरच्या चेंडूवर न्यूझीलंडच्या मार्टिन गुप्टिलला धावबाद करून इंग्लंडला जगज्जेतेपद मिळवून देणारा यष्टीरक्षक बटलरच होता.

२०२२ टी-२० विश्वचषक (कर्णधारपद): इयन मॉर्गनच्या निवृत्तीनंतर कर्णधारपद स्वीकारल्यावर बटलरने ऑस्ट्रेलियात झालेल्या २०२२ च्या टी-२० विश्वचषकात इंग्लंडला ऐतिहासिक विजेतेपद मिळवून दिले. कर्णधार म्हणून आयसीसी ट्रॉफी जिंकणारा तो इंग्लंडचा केवळ दुसराच खेळाडू ठरला.

इंग्लंडसाठी सर्वात वेगवान शतकांचे विक्रमइंग्लंडच्या एकदिवसीय इतिहासातील सर्वात जलद शतकांचा विक्रम बटलरच्याच नावावर आहे. त्याने पाकिस्तानविरुद्ध अवघ्या ४६ चेंडूंमध्ये शतक ठोकले होते. याशिवाय ५० चेंडू आणि ६१ चेंडूंत केलेली शतकेही त्याच्या नावावर आहेत. इंग्लंडसाठी सर्वात वेगवान शतकांच्या यादीत शीर्षस्थानी त्याचेच वर्चस्व राहिले आहे.

**आयपीएलमधील अविस्मरणीय दबदबा**

२०२२ चा ऑरेंज कॅप हंगामः राजस्थान रॉयल्सकडून खेळताना २०२२ च्या आयपीएल हंगामात त्याने तब्बल ८६३ धावा केल्या आणि सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरून 'ऑरेंज कॅप' पटकावली. एकाच मोसमात त्याने ४ शतके झळकावली होती. शतकांचा विक्रमः आयपीएलच्या इतिहासात बटलरने ७ शतके ठोकली आहेत. परदेशी खेळाडूंमध्ये आयपीएलमध्ये सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम त्याच्याच नावावर असून, एकूण शतकांच्या बाबतीत तो विराट कोहलीनंतर दुसऱ्या क्रमांकावर येतो.

**आधुनिक '३६०-डिग्री' फलंदाजी शैली**

बटलरच्या फलंदाजीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्याची 'रॅम्प शॉट', 'स्कूप' आणि रिव्हर्स हिट्स मारण्याची क्षमता. गोलंदाज कोणत्याही वेगाने चेंडू टाकत असला तरी यष्टीरक्षकाच्या डोक्यावरून किंवा फाईन लेगच्या दिशेने चौकार-षटकार खेचण्यात तो निष्णात मानला जातो. या अनोख्या शैलीने आधुनिक मर्यादित षटकांच्या क्रिकेटमधील आक्रमक फलंदाजीची परिभाषा बदलून टाकली आहे.

- ९०९६३७२०८२

# देशातील कॉर्पोरेट क्षेत्र-उद्योगपती आनंदात आणि शेतकरी गंभीर संकटात, शेतकऱ्यांनी आणखी किती दुःख सहन करावे!

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजनांच्या घोषणा करीत असते आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखवत असते,तरीही सरकारी आकडेवारीनुसार शेतकरी आणि कार्पोरेट उद्योग यात मोठी दरी व तफावत दिसून येत असून मोठे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.त्यामुळे देशाची १४५ कोटी जनता सरकारला विचारत आहे की, कॉर्पोरेट क्षेत्र आणि कृषिप्रधान देशाचा अन्नदाता शेतकरी यांच्यात सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत यात जमीन आसमानची तफावत असा भेदाभेद का? कारण देशाचा कर्ताधरता शेतकरी आहे आणि कॉर्पोरेट क्षेत्र शेतकऱ्यांच्या भरोशावर अवलंबून असते तरीही सरकार त्यांच्याकडे नेहमीच दुर्लक्ष करतांना दिसते.

आपण २०१४ ते २०२६ या १२ वर्षांत सरकारने उद्योगपती आणि कार्पोरेट क्षेत्राचे तब्बल १० लाख कोटी रुपए कर्ज माफ (राईट ऑफ) केले आहे ही माहिती राज्यसभेत सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने, तसेच वित्त मंत्रालयाने सादर केलेल्या आकडेवारीवरून ही माहिती उघडकीस आली आहे.यावरून आपण समजू शकतो की, सरकार शेतकऱ्यांच्या प्रती किती उदासीन असल्याचे दिसून येते. यामुळे कॉर्पोरेट उद्योगामध्ये आनंदाचे वातावरण दिसून येते तर,शेतकऱ्यांमध्ये सर्वत्र दुःखी आणि चिंतेचे वातावरण असल्याचे आपण पहातो. यावरून लक्षात येते की, सरकार मुठभर कॉर्पोरेट उद्योग व उद्योगपती यांच्यासाठी पाण्यासारखा पैसा कर्ज रूपात देतो आणि नंतर माफीही करतो. काही उद्योगपती तर करोडोंचे घोटाळे करून भारतातून पलायन सुध्दा करतात आणि केले सुध्दा आहे. त्याचप्रमाणे सरकार यांना सर्वतोपरी मदत सुध्दा करतात. याउलट ज्यांच्या भरोश्यावर देश चालतो,देशाची अर्थव्यवस्था चालते व १४५ कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरण्याचे काम करणाऱ्या ७० टक्के अन्नदाता शेतकऱ्यांकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.

यावरून लक्षात येते की सरकार शेतकऱ्यांच्या प्रती किती मोठा भेदभाव करीत आहे ही बाब आकडेवारीवरून स्पष्ट होते. शेतकरी नेहमीच दुःखी का असतो याचा विचार सरकारने कधीच केला नाही आणि करणारही नाही असे मला वाटते. कारण कॉर्पोरेट क्षेत्रातून व उद्योगपतीकडून सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होत असतो आणि शेतकऱ्यांकडून काहीच लाभ होत नाही म्हणून सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करीत असावेत असे मला वाटते. याच कारणांमुळे आज शेतकऱ्यांचे हालबेल होत आहे.यावर्षी कोरड्या दुष्काळामुळे देशासह राज्यांतील संपूर्ण शेतकरी अंधक्कारात असल्याचे दिसून येते. कारण आज देशातील ५० टक्के शेतकऱ्यांची अत्यंत गंभीर संकटात आणि वाईट परिस्थिती असल्याचे स्पष्ट चित्र स्पष्ट दिसून येते कारण पाऊसाच्या अभावामुळे अनेक शेतकऱ्यांची पीके कापल्याने त्यांच्या शेतातून एकही दाना येण्याची शक्यता नाही.

देशाचा शेतकरी हा निसर्गावर अवलंबून असल्याने पुवीर्पासूनच ओला दुष्काळ किंवा कोरडा दुष्काळाशी सामना करीत आलेला आहे.परंतू भारत हा कृषिप्रधान देश असतांना सुध्दा सरकार शेतकऱ्यांना सरळ हातांनी मदत करण्यास नेहमीच आणाकानी करीत असतात. याउलट सरकार उद्योगधंद्यांना सरळ हातांनी मदत करीत असुन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्याचे काम करीत असते.त्यामुळे पदोपदी देशाचा शेतकरी नेहमीच संकटात सापडत असतो आणि गरीबीच्या खाईत जात असल्याचे दिसून येते.

ज्या पध्दतीने सरकार मदतीचा हात कार्पोरेट उद्योगांना व उद्योगपतींना देत असते त्या पध्दतीने शेतकऱ्यांना का देत नाही हा अत्यंत गंभीर व विचार करणारा प्रश्न आहे.

आज राज्याच्या दृष्टीने विचार केला तर राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, आमदार-खासदार शेतकऱ्यांच्या बंधाऱ्यावर जाऊन पाहणी करीत आहे याचे मी मनापासून स्वागत करतो आणि दर महिन्याला शेतकऱ्यांच्या बंधाऱ्यावर संपूर्ण लोकप्रतिनिधी जाऊन तेथील आढावा सुध्दा घ्यायला हवा व त्यांच्या घरची चटणी भाकरी खायला सुध्दा प शेतकऱ्यांच्या मदतीचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा मिटिंग,बैठका, समिती नेमणे या भानगडीत शेतकऱ्यांच्या प्रती बिलकुल नसाव्यात.कारण राज्याच्या १४ कोटी जनतेला ग्यात आहे की, राज्याच्या शेतकऱ्यांची किती भयानक परिस्थिती आहे. मराठवाडा, विदर्भ व इतर भागात तर अत्यंत गंभीर व चिंताजनक परिस्थिती आहे आणि ही बाब सरकारला चांगल्याप्रकारे ग्यात असुन सुद्धा मदतीसाठी तारीख पे तारीख कशाला हवी एकीकडे सरकार म्हणते की मदतीपासून एकही शेतकरी वंचित रहाणार नाही मग वेळ कशाला घालवता, सरळ हातांनी मदत का करीत नाही?

ज्या पध्दतीने सरकार विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देते, योजनांसाठी ताबडतोब निधी उपलब्ध करून देते, उद्योजकांना कर्ज माफ करते त्याच धर्तीवर अन्नदाता शेतकऱ्यांना सरकारने यत्किंचितही वेळ न करता सरकारने सरळ हातांनी मदत केली पाहिजे व संपूर्ण कर्ज माफ केले पाहिजे. वेळ पडल्यास सरकारने ताबडतोब विकास कामे थांबवावित.परंतु शेतकऱ्यांच्या प्रती वेळ न करता ताबडतोब मदतीचा हात सामोर यायला हवा. सन्माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; मग सरकार मदत करण्यासाठी वेळ का करीत आहे. आज देशातील व राज्यातील अन्नदाता शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती व गडद संकट पहाता देशातील पक्ष-विपक्षाच्या आजी-माजी आमदार- खासदार, मंत्री यांनी कमीत-कमी पाच महिन्यांचे वेतन-पेंशन शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ताबडतोब सरकारच्या तिजोरीत जमा करावे.कारण पाच महिन्यांचे पगार-पेंशन शेतकऱ्यांच्या मदतीला दिली तरी ते गरीब होणार नाही किंवा शेतकऱ्यांसारखी आत्महत्येची पाळी सुध्दा येणार नाही किंवा त्यांना कोणत्याही दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही. त्यामुळे आजी-माजी लोकप्रतिनिधींनी आतातरी तत्परता दाखवून अन्नदात्या शेतकऱ्यांना सरळ हातांनी मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा. शेतकऱ्यांना भिक नको ते आपले,देशाचे,राज्याचे अन्नदाता आहेत.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# लता मंगेशकर युनिव्हर्सिटी, नागपूरचे कार्य सुरू

## विद्यापीठ स्थापनेची प्रक्रिया पूर्ण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

***एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पिटल, रणजीत देशमुख दंत महाविद्यालय, व्हीएसपीएम कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, व्हीएसपीएम माधुरीबाई देशमुख इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन या खाजगी विद्यापीठाच्या अखत्यारीत.***

नागपुरात लता मंगेशकर विद्यापीठ स्थापन करण्यास राज्य सरकारने मान्यता दिल्यामुळे नागपुरातील आरोग्य विज्ञान शिक्षणाला स्वतंत्र विद्यापीठाची जोड मिळाली आहे. व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूर या संस्थेने नागपुरात खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव दिला होता.

या संस्थेशी संलग्नित हिंगणा रोड, नागपूर स्थित एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पिटल, रणजीत देशमुख दंत महाविद्यालय, व्हीएसपीएम कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, व्हीएसपीएम माधुरीबाई देशमुख इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन हे आता या नवीन विद्यापीठाच्या अखत्यारित कार्यरत आहेत.

या विद्यापीठाला नवीन महाविद्यालय सुरू करण्यासही आता मदत होणार आहे. नवीन खासगी विद्यापीठाच्या अखत्यारित वैद्यकशास्त्र, दंतवैद्यक, फिजिओथेरपी आणि परिचर्या या शाखांमध्ये पदवी, पदव्युत्तर तसेच अतिविशेषीकरणाचे अभ्यासक्रम सुरू असून त्यात आणखी भरही पडेल. त्यामुळे आरोग्य विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये उच्च शिक्षणाची स्व-वित्तीय विद्यापीठीय व्यवस्था नागपुरात उपलब्ध होणार आहे.

संबंधित संस्थेकडे १,१३८ खाटांनी सुसज्जित लता मंगेशकर हॉस्पिटल आहे. वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी तसेच



रुग्णसेवेसाठी ही सुविधा महत्त्वाची ठरणार आहे. विद्यापीठ स्थापनेची प्रक्रिया पूर्ण झाली असून नवीन विद्यार्थ्यांचे पाहिल्या वर्षाचे प्रवेश लता मंगेशकर विद्यापीठाच्या माध्यमातून होत आहेत. व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशनचे अध्यक्ष रणजितबाबू देशमुख, संस्थापक डॉ. भाऊसाहेब भोगे आणि मुख्य सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यापीठाचा प्रवास सुरू झाला आहे.

लता मंगेशकर विद्यापीठ हा आरोग्य विज्ञान शिक्षणातील ऐतिहासिक टप्पा आहे, अशी प्रतिक्रिया संस्थेचे उपाध्यक्ष आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, "लता मंगेशकर विद्यापीठाची स्थापना ही नागपूरसह संपूर्ण विदर्भ, महाराष्ट्र व देशाच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. गेल्या अनेक वर्षांपासून व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशनच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षण, अत्याधुनिक रुग्णसेवा आणि समाजाभिमुख आरोग्यसेवा देण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे. आता या प्रयत्नांना स्व-वित्तीय विद्यापीठाच्या माध्यमातून अधिक व्यापक आणि सक्षम व्यासपीठ मिळणार आहे. विद्यार्थ्यांना केवळ दर्जेदार सैद्धांतिक शिक्षण नव्हे, तर प्रत्यक्ष रुग्णसेवा आणि क्लिनिकल प्रशिक्षणाचीही व्यापक संधी उपलब्ध होईल. या विद्यापीठाचा केंद्रबिंदू उत्तम शिक्षण, अत्याधुनिक संशोधन आणि संवेदनशील रुग्णसेवा हा असेल. भविष्यात आरोग्य विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये नवीन अभ्यासक्रम, संशोधनाच्या संधी उपलब्ध करून विदर्भातील विद्यार्थ्यांना त्यांच्या निकट जागतिक दर्जाचे आरोग्य शिक्षण उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे. नवीन विद्यापीठामुळे नागपूर हे केवळ विदर्भाचेच नव्हे, तर देशातील एक महत्त्वाचे मेडिकल एज्युकेशन आणि हेल्थकेअर हब म्हणून विकसित व्हावे, हा आमचा प्रयत्न राहील."

लता मंगेशकर युनिव्हर्सिटीचे वाइस चान्सलर डॉ काजल मित्रा म्हणाले की, हे विद्यापीठ केवळ एक शैक्षणिक संस्था न राहता शिक्षण, संशोधन, रुग्णसेवा आणि समाजसेवा यांचा संगम असलेले उत्कृष्ट आरोग्य विज्ञान केंद्र म्हणून विकसित करण्याचा आमचा संकल्प आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत आधुनिक आरोग्यसेवा पोहोचविणे, तसेच समाजाभिमुख आणि मूल्याधिष्ठित डॉक्टर, दंतवैद्य, फिजिओथेरपिस्ट व नर्सिंग व्यावसायिक घडविणे, हे विद्यापीठाचे प्रमुख उद्दिष्ट असेल.

लता मंगेशकर युनिव्हर्सिटीमध्ये डॉ मोहना मजुमदार या रजिस्ट्रार, डॉ उमेश शिवहरे हे कंट्रोलर ऑफ एक्झामिनेशन्स आणि आशिष जैन हे चीफ फायनान्स अँड अकाउंट्स ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. विद्यापीठाचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी सल्लागार डॉ. हृदय देशमुख, संस्थेचे सचिव युवराज चालखोर, वित्तीय संचालक सीए अनिल पारख, कोषाध्यक्ष डॉ. सुधीर देशमुख आदी परिश्रम घेत आहेत.

---

# मुकबधीर विद्यार्थ्यांनी दिला गणपती बाप्पा निरोप




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

मूक बधिर निवासी शाळा सावनेर येथे गेल्या १० दिवसांपासून उत्सवात साजरा करण्यात आलेल्या आपल्या लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देण्यात आला. श्री गणेशाची १० दिवसांची प्राणप्रतिष्ठा उत्साहात पार पडली. दहा दिवस विविध प्रकारचे कार्यक्रम या उत्सवानिमित्त घेण्यात आले दररोज सावनेर शहरातील शाळेच्या हितचिंतकांनी आरतीला उपस्थित राहून श्री गणरायाची मनोभावे उपासना केली.आज दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील नागरिक,ज्येष्ठ नागरिक मंडळ, शाळेचे हितचिंतक, संस्थेचे पदाधिकारी,माजी विद्यार्थी, शाळेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून श्री गणरायाचे दर्शन घेऊन महाप्रसाद घेतला.

या उत्सवाची सांगता व विसर्जन कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष प्रशांत डवले, सचिव नारायण समर्थ, कोषाध्यक्ष निखिल समर्थ, सहसचिव डॉ. अमित चेडे ,संचालिका मीनाताई डवले, प्रशासकीय अधिकारी मंगलाताई समर्थ, सौ श्वेताताई समर्थ, कु.स्वर्णिमा समर्थ, मास्टर लक्ष समर्थ इत्यादी उपस्थित होते. श्री गणेश उत्सवाच्या पर्वावर संस्थेचे अध्यक्ष श्री प्रशांत डवले, सचिव नारायण समर्थ, मुख्याध्यापिका सुवर्णा महाशब्दे यांनी मनोगत व्यक्त केले व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी तसेच सुरक्षिततेसाठी श्री गणराया चरणी प्रार्थना केली. पूजन व आरती करून ढोलताशाच्या गजरात गणपती बाप्पाचा जयघोष करत श्री लाडक्या गणरायाला निरोप दिला.

---

# स्वागत कक्षात महावितरणचा सकारात्मक पुढाकार: उद्योजकांकडून महावितरणच्या कार्याचे कौतुक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

औद्योगिक क्षेत्राच्या शाश्वत विकासाला गती देणे, निर्मिती क्षेत्रातील अडथळे दूर करणे आणि उद्योजकांच्या वीजविषयक समस्यांचे अत्यंत पारदर्शक व जलद गतीने निवारण करणे या उद्देशाने महावितरण सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. याच मालिकेअंतर्गत, महावितरणच्या नागपूर शहर मंडळाअंतर्गत येणाऱ्या औद्योगिक ग्राहकांसाठी येथील 'विद्युत भवन' येथे स्वागत कक्षाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. महावितरण नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आणि नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रफुल्ल लांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



संवादाच्या या विशेष मंचावर नागपूर जिल्ह्यातील प्रमुख औद्योगिक क्षेत्रांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यामध्ये एमआयडीसी इंडस्ट्रिज असोसिएशनचे अध्यक्ष पी. मोहन, 'बीएमए'चे पदाधिकारी, तसेच हिंगणा एमआयडीसी, बुटीबोरी एमआयडीसी आणि वांजरा एमआयडीसी परिसरातील विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महावितरणच्या वतीने नागपूर शहर मंडळाचे सर्व कार्यकारी अभियंता, बैठकीचे समन्वयन करणाऱ्या उपकार्यकारी अभियंता स्वाती फाटे व नागपूर शहर मंडळातील अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान औद्योगिक प्रतिनिधींनी कारखानदारी व उत्पादनावर परिणाम करणाऱ्या विविध तांत्रिक समस्यांवर महावितरणच्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. प्रामुख्याने वीज पुरवठ्यात येणारे अडथळे, व्होल्टेजमधील चढ-उतार सौर ऊर्जा युनिट समायोजन आणि बिलिंगशी संबंधित प्रश्न तसेच वीज शुल्क परतावा यांसारख्या गंभीर व अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

उद्योजकांनी मांडलेल्या सर्व समस्या आणि तक्रारी अत्यंत गांभीर्याने ऐकून घेतल्यानंतर मुख्य अभियंता राजेश नाईक आणि अधीक्षक अभियंता प्रफुल्ल लांडे यांनी उपस्थितांना पूर्ण दिलासा दिला. उद्योगांना दर्जात्मक व सुरळीत वीज पुरवठा देण्यास महावितरण प्राधान्य देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत सादर केलेल्या प्रत्येक तक्रारीची व तांत्रिक मुद्द्यांची महावितरणच्या तांत्रिक चमूकडून सखोल पाहणी केली जाईल आणि येत्या पुढील 'स्वागत कक्ष' बैठकीपूर्वी सर्व समस्यांवर ठोस, टप्प्याटप्प्याने आणि प्रभावी उपाययोजना करून त्यांचे पूर्ण निवारण केले जाईल, असे ठाम आश्वासन महावितरण प्रशासनाने दिले.

**उद्योजकांकडून महावितरणच्या तत्परतेचे कौतुक**

महावितरणने दाखवलेली ही तत्पर, सहकार्याची आणि ग्राहककेंद्रित भूमिका उपस्थितांसाठी अत्यंत दिलासादायक ठरली. एमआयएचे अध्यक्ष पी. मोहन यांनी महावितरणच्या या सकारात्मक पुढाकाराचे आणि सुलभ कार्यपद्धतीचे मनापासून कौतुक केले. ते म्हणाले की, "महावितरणतर्फे नियमितपणे आयोजित केला जाणारा 'स्वागत कक्ष' हा उद्योजक आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांमधील थेट संवादाचा एक अत्यंत प्रभावी व विश्वासार्ह मंच ठरत आहे. यामुळे वारंवार उद्भवणाऱ्या समस्यांची वेळेत ओळख पटवून त्यावर संयुक्तपणे लवकरात लवकर तोडगा काढणे शक्य होत आहे."

औद्योगिक ग्राहकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने कारवाई करण्याच्या महावितरणच्या या सकारात्मक व सहकार्यात्मक धोरणामुळे नागपूर विभागातील औद्योगिक क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला असून, यामुळे स्थानिक उद्योगांच्या वाढीस आणि विस्तारास नवी ऊर्जा व बळ मिळेल, असा दृढ विश्वास सर्व उपस्थितांनी या वेळी व्यक्त केला.

---

# आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या प्रलंबित प्रश्नांवर आरोग्य सेवा आयुक्तांसोबत विस्तारित बैठक

### मानधन, सामाजिक सुरक्षा, सेवा-सुविधा व कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महाराष्ट्रातील आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या विविध प्रलंबित प्रश्न व मागण्यांबाबत आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, मुंबई येथे आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांच्या उपस्थितीत विस्तारित बैठक घेण्यात आली. राज्यातील आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या प्रश्नांना शासनस्तरावर प्रभावीपणे मांडण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.

या बैठकीस राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे सहसंचालक राजेंद्र भालेराव, राज्य आशा समन्वयक किशोर गांगुर्डे, सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, आयटकचे कॉ. राजू देसले, नागपूर येथील कॉ. राजेंद्र साठे, कॉ. आनंदी अवघडे, कॉ. आरमायटी इराणी, कॉ. हणमंत कोळी, दत्ता देशमुख,मीना कोळी, उज्वला पाटील यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून आलेले आशा सेविका व गटप्रवर्तक कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा**

बैठकीमध्ये आशा सेविका व गटप्रवर्तकांना दैनंदिन कामकाजात भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मानधन व मोबदला, सामाजिक सुरक्षा, प्रोत्साहनपर भत्ते, सेवा-सुविधा, कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक साधने व सुविधा, तसेच कामाच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या विविध अडचणी, वयाची मर्यादा ६५ वर्षे करूने, प्रसुती रजा लागू करणे, एपीएल / बीपीएल अट रद्द करणे, याबाबत संघटनेच्या प्रतिनिधींनी आपली भूमिका मांडली.



आशा सेविका व गटप्रवर्तक या आरोग्य विभागाच्या विविध योजना आणि उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण तसेच शहरी भागात प्रत्यक्ष पातळीवर काम करीत आहेत. गर्भवती महिला, बालके, माता, कुटुंबे आणि विविध घटकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती पोहोचविणे, जनजागृती करणे, सर्वेक्षण करणे, आरोग्यविषयक योजनांशी नागरिकांना जोडणे तसेच विविध शासकीय उपक्रमांमध्ये सहभाग घेणे, अशी महत्त्वाची कामे त्या सातत्याने पार पाडत आहेत.

**कामाच्या वाढत्या जबाबदाऱ्यांकडे लक्ष देण्याची मागणी**

बदलत्या आरोग्य व्यवस्थेमुळे आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या कामाच्या जबाबदाऱ्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या आणि प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक सुविधा व योग्य मोबदला मिळणे गरजेचे असल्याचे संघटनेच्या प्रतिनिधींनी बैठकीत मांडले. तसेच कामासाठी आवश्यक असणारी डिजिटल साधने, ऑनलाइन कामकाज, संपर्क सुविधा आणि इतर आवश्यक बाबी उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या सामाजिक सुरक्षेच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीयार्ने लक्ष देऊन त्याबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

**शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा**

आशा सेविका व गटप्रवर्तक या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा दुवा असून, ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे त्यांच्या प्रलंबित मागण्यांचा शासनाने सहानुभूतीपूर्वक व सकारात्मक विचार करून त्यावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. बैठकी दरम्यान संबंधित प्रश्न व मागण्यांवर पुढील कार्यवाही बाबतही चर्चा झाली. संघटनेच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या विविध मागण्यांचा शासनस्तरावर सकारात्मक विचार करून त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

प्रश्न सोडविण्यासाठी पुढील पाठपुरावा या विस्तारित बैठकीमुळे राज्यातील आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या प्रलंबित प्रश्नांना आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यां समोर थेट मांडण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने संबंधित मागण्यांबाबत पुढील पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या प्रश्नांवर शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन त्यांच्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा यावेळी उपस्थित संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

---

**थोडक्यात**

## राष्ट्रीय सेवा योजना ही जबाबदार नागरिक घडवणारी कार्यशाळा: खुशाल कापसे

### महात्मा गांधी महाविद्यालय येथे स्थापनादिन साजरा




**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

महात्मा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी येथे राष्ट्रीय सेवा योजना दिनाचा स्थापना दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना भारतीय संविधान स्तंभ निर्मितीचे प्रणेते तथा जिल्हा परिषद शिक्षक खुशाल कापसे यांनी "राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ उपक्रमापुरती मर्यादित नसून ती जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडवणारी खरी कार्यशाळा आहे," असे प्रतिपादन केले. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे औचित्य साधून आयोजित या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. लोकचंद्र जाधव होते. तर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राकेश कभे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. प्रमोद गोरडे, इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. चव्हाण प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांच्या जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विषद करताना खुशाल कापसे म्हणाले की "विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, श्रमप्रतिष्ठा व सार्वजनिक स्वच्छतेचे मूल्य आणि जबाबदारीची जाणीव, व्यक्तिमत्त्व विकास करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान अतुलनीय आहे. राष्ट्रीय सेवा योजना केवळ प्रमाणपत्र व गुणपत्रिकेवर गुण मिळविण्यासाठी नसून जीवनाचा दृष्टिकोन बदलणारे माध्यम आहे. अभ्यासासोबतच समाजातील घटकांशी संवाद साधणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यावर शक्य ती मदत करणे ही मूल्यांची शिकवण ठरर च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळते. आजच्या युवकांनी सामाजिक जबाबदारी ओळखून राष्ट्राच्या उभारणीत सक्रिय सहभाग नोंदवला पाहिजे.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. लोकचंद्र जाधव यांनी तंत्रज्ञानाचा उपयोग विवेक जागृत ठेवून करावा असे आवाहन केले. महाविद्यालयाच्या विविध विभागांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.महेंद्र भलमे, प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राकेश कभे यांनी तर आभार प्रा. संतोष ठकरेले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.संदीप भोयर प्रा.महेश चोंदे डॉ. विजया वानखेडे प्रा. मुक्ता रोकडे प्रा. वनिता खांडेकर प्रा. अजय मंगल यांनी सहकार्य केले

प्रत्यक्ष अनुभवातून आरोग्य शिक्षणाची नवी दिशा ;

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडलीच्या विद्यार्थ्यांची प्राथमिक आरोग्य केंद्र कोदामेंढी येथे क्षेत्रभेट दिली



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

पुस्तकातील ज्ञान जेव्हा प्रत्यक्ष अनुभवाला जोडले जाते, तेव्हा शिक्षण अधिक अर्थपूर्ण होते. या विचाराला अनुसरून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध ज्ञानवर्धक व अनुभवाधारित उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांची प्राथमिक आरोग्य केंद्र, कोदामेंढी येथे क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. या क्षेत्रभेटीदरम्यान वैद्यकीय अधिकारी यशश्री पखेडे उपस्थित होत्या. तसेच सुपरवायझर कविता सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रातील विविध विभागांची सविस्तर माहिती देत प्रत्यक्ष परिसराची पाहणी करून दिली. विद्यार्थ्यांना लहान मुले, गर्भवती माता तसेच वृद्ध रुग्णांसाठी आरोग्य केंद्रामध्ये घेतली जाणारी काळजी, विविध वॉर्ड, औषध भांडार, तात्काळ रुग्णवाहिका सेवा, औषध वितरण कक्ष, लसीकरण कक्ष तसेच इतर विभागांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे विविध प्रश्न विचारत आरोग्य केंद्रातील कार्यपद्धती समजून घेतली.

यावेळी विद्यार्थ्यांनी मुलाखतीच्या माध्यमातून आरोग्याच्या चांगल्या सवयी, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, स्वच्छता आणि आरोग्याची काळजी याविषयी माहिती मिळवली. विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे आरोग्य केंद्र परिसरातील गप्पी माशांची टाकी. गप्पी मासे पाण्यातील डासांच्या अळ्या खाऊन डासांची संख्या कमी करण्यास कशी मदत करतात, याचे महत्त्व कविता सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. वैद्यकीय अधिकारी यशश्री पखेडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आरोग्याची काळजी, संतुलित आहाराचे महत्त्व, डोळ्यांची निगा आणि वैयक्तिक स्वच्छता याविषयी मार्गदर्शन केले. तसेच रक्त तपासणी कक्षातील दीपक कटोके यांनी विद्यार्थ्यांना रक्त तपासणीची प्रक्रिया प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितली. याशिवाय रुग्णालयातील वैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट तसेच मुदत संपलेल्या औषधांची सुरक्षित पद्धतीने विल्हेवाट कशी लावली जाते, याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या संपूर्ण क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने निरीक्षण केले, प्रश्न विचारले आणि प्रत्यक्ष अनुभवातून आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण ज्ञान आत्मसात केले. त्यामुळे ही क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, अनुभवसमृद्ध आणि संस्मरणीय ठरली.

हा उपक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. सहशिक्षक निलेश जाधव सर यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यासाठी, निरीक्षण करण्यासाठी व संवाद साधण्यासाठी प्रोत्साहित केले.क्षेत्रभेट म्हणजे केवळ शाळेबाहेर जाणे नव्हे; तर प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान, जिज्ञासा आणि जीवनोपयोगी कौशल्ये विकसित करण्याची एक प्रभावी शैक्षणिक प्रक्रिया आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये हे कौशल्य विकसित होण्यास मदत झाली.

थोडक्यात

## सालेकसा येथे २९ सप्टेंबरला रोजगार महाकुंभ मेळावा

**नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम**

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

सालेकसा : महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालय, मुंबई यांच्या वतीने जिल्ह्यातील नक्षलग्रस्त, दुर्गम व अतिदुर्गम भागातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रोजगार महाकुंभ महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत सालेकसा येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय, सालेकसा येथे दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी रोजगार महाकुंभ मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचा लाभ सालेकसा तालुक्यासह नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील बेरोजगार युवक-युवतींनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात आपल्या कार्यक्षेत्रातील बेरोजगार युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रोजगाराच्या उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, तसेच शक्य असल्यास आपल्या नक्षल क्षेत्रातील अधिकाधिक युवक-युवतींना या मेळाव्याची माहिती देऊन सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी ही संधी महत्त्वाची असून, जास्तीत जास्त युवक-युवतींनी मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## पेन्शनर्सचे २४ तासांचे धरणे आंदोलन, २९ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या

**प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटनेचा इशारा**

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

निवृत्तिवेतनधारक, कुटुंब निवृत्तिवेतनधारक तसेच राज्य सरकारचे ज्येष्ठ नागरिक यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटना, जिल्हा शाखा गडचिरोली यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २४ तासांचे धरणे (पडाव) आंदोलन करण्यात येणार आहे. संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनानुसार, सोमवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता आंदोलनाला सुरुवात होऊन बुधवार, ३० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत हे आंदोलन सुरू राहणार आहे. अखिल भारतीय राज्य सरकारी पेन्शनर्स फेडरेशनच्या बॅनरखाली देशभरात विविध मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील निवृत्तिवेतनधारक, कुटुंब निवृत्तिवेतनधारक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन संघटनेने केले आहे. दरम्यान, देशभरातील पेन्शनर्स संघटनांकडून सप्टेंबरअखेर विविध टप्प्यांत आंदोलनांचे आयोजन केले जात असल्याचे वृत्त आहे. निवेदनावर महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटनेचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष विमल अंबाडकर, जिल्हा सचिव परवीन शेख आणि जिल्हा कोषाध्यक्ष कुंदा सालवे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पेन्शनर्सच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन असून जिल्ह्यातील सर्व पेन्शनर्सनी सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## दक्षिण नागपुरात शिवसेनेचा भव्य पक्षप्रवेश सोहळा

**शेकडो नागरिकांचा जाहीर पक्षप्रवेश, २७ सप्टेंबर रोजी आयोजन**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यावर विश्वास ठेवून दक्षिण नागपूरमधील शेकडो नागरिक शिवसेनेत जाहीर प्रवेश करणार आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना दक्षिण नागपूरच्यावतीने भव्य पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पक्षप्रवेश सोहळा रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता पिंपळा रोडवरील विठ्ठल लॉन्ससमोरील भावसार सेलिब्रेशन भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यास पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव, संपर्कप्रमुख संजय निरुपम, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, विधान परिषद आमदार कृपाल तुमाने तसेच जिल्हाप्रमुख व मनपा नगरसेवक सूरजजी गोजे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दक्षिण नागपूर परिसरातील विविध भागांतील नागरिकांचा या पक्षप्रवेश सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभाग राहणार असून, शिवसेनेच्या विचारधारेवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांचे पक्षात स्वागत करण्यात येणार आहे. या सोहळ्यास नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन शिवसेना दक्षिण नागपूरचे उपशहर प्रमुख धम्मा सोनटक्के आणि विधानसभा संघटक विशाल कोरके यांनी केले असून, शिवसेना दक्षिण नागपूरच्या समस्त पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## नागपूर विभागातील नियोजित रोजगार महाकुंभ मेळाव्यास स्थगिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नागपूर विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता २२ सप्टेंबर २०२६ रोजी लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर विभागात २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेले रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-२०२६ रोजगार मेळावे अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आले आहेत. नागपूर विभागात एकूण २३ ठिकाणी हे रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले होते. सद्यस्थितीत हे सर्व मेळावे स्थगित करण्यात आले असून, संबंधित उमेदवारांनी व घटकांनी याची नोंद घ्यावी, असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त निता प्र. औघड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

# चीकना येथील नळाच्या पाण्याबाबतचा संभ्रम दूर

**प्रत्यक्ष पाहणी, पंचनामा आणि अहवालातून पाणी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे स्पष्ट, सापाची कात आढळल्याचा दावा ग्रामपंचायत व आरोग्य विभागाने फेटाळला, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन**

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

गट ग्रामपंचायत चीकना तालुका कुही येथील नळाच्या पाण्यात सापाची कात आढळल्याचा दावा काही बातमीपत्रे, वृत्तमाध्यमे व सोशल मीडियावर प्रसारित झाल्याने नागरिकांमध्ये भीती व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, या घटनेची तातडीने दखल घेत ग्रामपंचायत प्रशासन, आरोग्य विभाग आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष पाहणी, पंचनामा आणि तपासणी अहवालातून पिण्याचे पाणी संपूर्णपणे सुरक्षित, शुद्ध आणि आरोग्यास निरोगी असल्याचे स्पष्ट झाले आहे.



**प्रत्यक्ष पाहणी आणि पंचनाम्याची वस्तुस्थिती**

स्थानिक नागरिक तुळशीदासजी कळंभे यांच्या घरातील नळाखालील बादलीत सापाची कात आढळल्याची माहिती मिळताच, २१/०९/२०२६ व २२/०९/२०२६ रोजी आरोग्य विभाग आरोग्य सेवक व ग्रामपंचायत प्रशासनाने प्रत्यक्ष घटनास्थळी आणि पाण्याच्या टाकीवर भेट देऊन पाहणी केली.

**पाण्याच्या टाकीची पाहणी**

मुख्य पाण्याच्या टाकीवर जाऊन टॉर्चच्या साहाय्याने टाकीची सखोल पाहणी केली असता, टाकीत किंवा पाण्यात सापाची कात अथवा कोणताही बाह्य घटक आढळला नाही. तसेच, टाकीजवळील नागरिकांशी संवाद साधला असता त्यांनी पुरवठा होणारे पाणी स्वच्छ व पिण्यायोग्य असल्याचे सांगितले.

**वैयक्तिक नळ जोडणी**

ग्राम प्रशासनाने स्पष्ट केले की, प्रत्येक वैयक्तिक नळ जोडणीला फेरूल बसवण्यात आलेले आहे. त्यामुळे पाइपलाइनमधून असा कोणताच गाळ किंवा सापाची कात नळातून बाहेर येणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे.

**आरोग्य अहवाल आणि ओटी टेस्ट निष्कर्ष**

आरोग्य विभागाच्या पथकाने गावात भेट देऊन पाण्याच्या गुणवत्तेची वैज्ञानिक तपासणी केली. क्लोरिनेशन व ओ.टी. टेस्ट मशीनद्वारे पिण्याच्या पाण्याची तपासणी केली असता, पाण्यातील क्लोरिनेशनचे प्रमाण नियमानुसार योग्य असल्याचे आढळले.

**आरोग्य सर्वेक्षण**

आरोग्य पथकाने तुळशीदास कळंभे, हरिदास कळंभे, विजय बावणे व इतर ग्रामस्थांच्या घरी जाऊन आरोग्य चाचणी व विचारपूस केली. गावात पाण्यामुळे होणारा कोणताही जलजन्य वा साथीचा आजार पसरलेला नाही असा निष्कर्ष अहवालात नोंदवण्यात आला आहे.

**अहवाल निष्कर्ष**

आरोग्य अहवालानुसार ग्रामपंचायतीचे पाणी पूर्णपणे पिण्यायोग्य व आरोग्यास सुरक्षित असल्याचे घोषित करण्यात आले आहे.

**ग्रामपंचायत बैठक व प्रशासकीय सूचना**

या संपूर्ण प्रकरणाची माहिती देण्यासाठी आणि नागरिकांमधील भीती दूर करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, पोलीस प्रशासन आणि आरोग्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.

**बैठकीत घेतलेले महत्त्वाचे निर्णय व दिशा-निर्देश**

पाण्याच्या मुख्य टाकीची नियमित दरमहा स्वच्छता करून तारीख नोंदवण्यात यावी.पिण्याच्या पाण्यामध्ये दररोज नियमित क्लोरिनेशन करण्यात यावे. पाण्याच्या टाक्यांवरील झाकणे, व्हॉल्व्ह व पाइपलाइनची दुरुस्ती व सुरक्षेतेची काळजी घ्यावी.

डास व कीटक प्रतिबंधासाठी गवत-कचरा काढणे, डबकी बुजवणे व औषध फवारणीच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामस्थांना नळाच्या पाईपला कापड बांधणे, पाणी उकळून-गाळून पिणे आणि रात्री झोपताना डासदाणीचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

**प्रशासनाचे नागरिकांना आवाहन**

या बैठकीत सरपंच भगवानजी जुमडे, उपसरपंच सिद्धार्थ कावळे, ग्रामसेवक समता पाटील, आरोग्य अधिकारी माधव धुर्वे, सीताराम खंडाईत, आशा सेविका मीराबाई शिवरकर आणि ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायत व आरोग्य प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, सोशल मीडियावरील अपूर्ण माहिती, गैरसमज किंवा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. पाण्याबाबत कोणतीही शंका असल्यास थेट ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा.

# १५% प्रोत्साहन भत्ता व एकस्तर पदोन्नतीसाठी कर्मचारी संघटनांची आक्रमक भूमिका

**जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक, विद्यमान सुविधांमध्ये वाढ करून २५% प्रोत्साहन भत्ता देण्याचा प्रस्ताव**

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना लागू असलेला १५ टक्के प्रोत्साहन भत्ता आणि एकस्तर पदोन्नतीचा लाभ भविष्यात रद्द होण्याची शक्यता व्यक्त होत असताना, या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडली. बैठकीत कर्मचारी संघटनांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली.

दि. ६ ऑगस्ट २००२च्या शासन निर्णयाच्या आधारे गडचिरोली जिल्ह्यात कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांना १५ टक्के प्रोत्साहन भत्ता आणि एकस्तर पदोन्नतीचा लाभ अनुज्ञेय असल्याचे संघटनांनी नमूद केले. मात्र, जिल्ह्यातील नक्षलवादाची परिस्थिती संपुष्टात आल्याच्या शासनाच्या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर या तरतुदींचा फेरआढावा घेण्यासाठी नागपूर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आठ सदस्यीय पुनर्विलोकन समिती गठीत करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात हे लाभ रद्द होण्याची शक्यता असल्याने कर्मचारी संघटना सावध झाल्या आहेत.

बैठकीच्या सुरुवातीला निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी विषयाची माहिती दिली. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संघटनांच्या प्रतिनिधींना आपली भूमिका मांडण्याचे निर्देश दिले.

**२५ टक्के प्रोत्साहन भत्त्याची मागणी**

जिल्ह्यातील सर्व कर्मचारी संघटनांच्या वतीने महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांनी सविस्तर निवेदन सादर केले. गडचिरोलीची भौगोलिक परिस्थिती, जंगलव्याप्त व दुर्गम डोंगराळ आदिवासी भाग, अपुऱ्या दळणवळणाच्या सुविधा, ग्रामीण भागातील निवासाची समस्या तसेच जिल्ह्यातील सुमारे २८ टक्के रिक्त पदांमुळे कर्मचाऱ्यांवर येणारा अतिरिक्त कामाचा ताण याकडे त्यांनी लक्ष वेधले. या परिस्थितीचा कर्मचाऱ्यांच्या शारीरिक व मानसिक ताणासोबतच त्यांच्या कुटुंबाच्या शिक्षण व आरोग्यावरही परिणाम होत असल्याचे संघटनांनी बैठकीत मांडले.

संघटनांनी विद्यमान शासन निर्णयातील तरतुदींमध्ये वाढ करून मूळ वेतन व महागाई भत्त्यावर २५ टक्के प्रोत्साहन भत्ता, घरभाडे भत्त्यात वाढ करून ३० टक्के, तसेच प्रत्येक पदोन्नतीच्या टप्प्यावर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ कायम ठेवण्याची मागणी केली. याशिवाय विविध विभागांतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या मानधनाच्या २५ टक्के प्रोत्साहन भत्ता देण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडण्यात आला.

**जिल्हाधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद**

या सर्व मागण्यांवर जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व विभागप्रमुख तसेच कर्मचारी संघटनांनी आपापली लेखी निवेदने सादर करावीत, अशा सूचना दिल्या. तसेच या विषयावर पुन्हा बैठक घेण्याचे निर्देशही देण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून कर्मचारी हिताचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याचे संघटनांनी सांगितले.

बैठकीस महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले, जिल्हाध्यक्ष रतन शेंडे, विभागीय उपाध्यक्ष दामोदर पटले, विभागीय संघटक साई कोंडावार, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील चडगुलवार, सरचिटणीस भास्कर मेश्राम, कार्याध्यक्ष आनंद गडप्पा, तसेच आशिष सोरते, मनीष किरपान, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे लतीफ पठाण, गजानन ठाकरे, विजय पत्रे यांच्यासह विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ढोल-ताशांच्या गजरात गणरायाला निरोप

**आमगाव शहरातील सार्वजनिक व घरगुती गणपतींचे माता बोडीत शांततेत विसर्जन, भाविकांची मोठी उपस्थिती**

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव शहरातील सार्वजनिक तसेच घरगुती गणपती बाप्पांच्या विसर्जन मिरवणुका ढोल-ताशांच्या गजरात आणि गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, अशा जयघोषात उत्साहात पार पडल्या. शहरातील विविध भागांतून गणेशभक्तांनी सजविलेल्या गणरायाच्या मूर्तींच्या मिरवणुका मुख्य मार्गाने काढत तुकडोजी चौक येथील माता बोडी येथे विसर्जन करण्यात आले. विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठ्या संख्येने भाविक, महिला, युवक तसेच नागरिक सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या निनादाने आणि भक्तिमय वातावरणाने संपूर्ण शहर दुमदुमून गेले होते. अनेक गणेश मंडळांनी आकर्षक सजावट व पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढून गणरायाला भावपूर्ण निरोप दिला.

विसर्जनाचा कार्यक्रम शांततेत पार पडावा यासाठी आमगाव पोलिसांकडून ठिकठिकाणी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मिरवणुकीच्या मार्गावर पोलिसांची विशेष नजर ठेवण्यात आली होती. वाहतूक सुरळीत राहावी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी आवश्यक त्या उपाययोजना केल्या. गणेशभक्तांनीही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात गणरायाचे विसर्जन केले. त्यामुळे आमगाव शहरातील गणेश विसर्जन सोहळा पोलीस बंदोबस्तात शांततेत आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.



# शेतकरी झाले विद्यार्थी, थेट कृषी विद्यापीठात घेतले आधुनिक शेतीचे धडे!

**उमठ्यातील शेतकरी पुत्र कापूस उत्पादक गटाची अकोला कृषी विद्यापीठाला भेट, शास्त्रीय शेतीसह उत्पादन खर्च कमी करण्याचे घेतले ज्ञान**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

शेतात नवनवीन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांनी आता शास्त्रीय ज्ञानाची जोड देण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. पानी फाउंडेशनच्या सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ मध्ये सहभागी असलेल्या नरखेड तालुक्यातील उमठा येथील शेतकरी पुत्र कापूस उत्पादक गटातील तरुण शेतकऱ्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे शिवार फेरी करून आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे धडे घेतले.




या शिवार फेरीत कापूस व विविध पिकांची प्रात्यक्षिके, आंतरपीक पद्धती, पीक व्यवस्थापन, उत्पादन खर्च कमी करण्याच्या पद्धती, गांडूळखत, सेंद्रिय निविष्ठांचा वापर तसेच डेअरीसारख्या शेतीपूरक व्यवसायांची माहिती शेतकऱ्यांनी घेतली. शेतीतील प्रयोग केवळ अनुभवावर न करता त्याला शास्त्रीय ज्ञानाची जोड दिल्यास उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यास मदत होऊ शकते, याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळाले.

यावेळी शेतकऱ्यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांची भेट घेऊन शेतीविषयक विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. शेतकऱ्यांनी शेतीतील SOP7, जीवामृत आणि दशपर्णी अर्काच्या वापराचे आपले अनुभवही त्यांच्यासमोर मांडले. गट शेतीच्या माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने शेती करून उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पन्न वाढविण्याच्या उपायांवरही चर्चा झाली. शेतीत जे शिकता, ते शास्त्राच्या ज्ञानाशी जोडा आणि ते प्रत्यक्ष शेतात उतरवा, असा संदेश डॉ. शरद गडाख यांनी शेतकऱ्यांना दिला.

पानी फाउंडेशनच्या ह्यडिजिटल शेतीशाळेला शास्त्रीय ज्ञानाची जोड देण्यासाठी कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांचा सहभाग महत्त्वाचा ठरत आहे. फार्मर कप २०२६च्या समितीचे सदस्य असलेल्या डॉ. गडाख यांच्याशी झालेल्या संवादामुळे शेतकऱ्यांना कृषी संशोधन आणि प्रत्यक्ष शेती यांच्यातील दुवा समजून घेता आला.

या दौऱ्यात पुरुष शेतकऱ्यांसोबत महिला शेतकऱ्यांचाही सहभाग राहिला. आधुनिक शेती तंत्रज्ञान, कमी खर्चातील शेती, आंतरपीक पद्धती, सेंद्रिय निविष्ठा आणि शेतीपूरक व्यवसाय याबाबत मिळालेले ज्ञान प्रत्यक्ष शेतात वापरण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला. या शिवार फेरीत केशवराव पोटपिटे, रमेश ठाकरे, प्रदीप कोहळे, राजकुमार चौधरी, प्रकाश घोरपडे, प्रविण भोयर, प्रविण पोटपिटे, राहुल निंबुरकर, अमित थेटे, धनंजय पोटपिटे, श्रीधर सलाम, गौरव ठाकरे आणि उमेशभाऊ टेंभेकर यांच्यासह गटातील शेतकरी सहभागी झाले होते. अकोला कृषी विद्यापीठातील हा अभ्यासदौरा शेतकरी पुत्र कापूस उत्पादक गटाच्या ज्ञानवृद्धीसाठी महत्त्वपूर्ण ठरला.



विजय, ज्योती, सायली, गौरी चौधरी,
भगवान नगर, नागपूर



गुरूकुल आश्रम शाळा,
उदासा, उमरेड

## बाप्पांच्या भवती अवतरले 'प्रयागराज'



दक्षिण नागपुरातील विवेकानंद नगर, म्हाळगी नगर येथील रहिवासी शुभम जोशी यांच्या घरी बापांच्या सजावटीत प्रयागराज अवतरले आहे. सजावटीची सर्वदूर चर्चा असून कौतुक केले जात आहे.



अजिंक्य विनोद तिवारी
महेश नगर, नागपूर

# लोकसहभागातून विद्यार्थ्यांची प्रेरणादायी विमानवारी

डॉ. राजेंद्र टेकाडे
काटोल, जि. नागपूर

शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील अक्षरे नसतात, तर ते एक स्वप्न असते. डोळ्यांत साठवलेलं, मनात जपलेलं आणि योग्य संधी मिळाली की आकाशाला गवसणी घालणारं स्वप्न ग्रामीण विद्यार्थी बघत असतो. नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यामधील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, थूगाव निपाणी येथील ४९ चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत हेच स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले आणि तेही संपूर्ण गावाने, समाजाने व शिक्षकांनी एकत्र येऊन साकारले. ५ सप्टेंबर, शिक्षक दिनाच्या संध्याकाळी या मुलांनी नागपूर ते बंगळुरू असा विमानप्रवास केला.

तो क्षण केवळ एक सहल न राहता ग्रामीण भारताच्या शिक्षणव्यवस्थेत एक नवीन अध्याय लिहिणारा ठरला. ही सहल शक्य झाली ती केवळ पैशामुळे नव्हे तर त्यामागे उभ्या असलेल्या माणुसकीमुळे शक्य झाली. या उपक्रमासाठी एकूण ५ लाख ४४ हजार इतका खर्च आला, आणि हा संपूर्ण भार कुणा एकट्याने नव्हे, तर संपूर्ण गावाने खांद्याला खांदा लावून पेलला. यामध्ये पालकांनी १ लाख ८० हजारांचा वाटा उचलला, तर समाजातील विविध घटकांनी लोकसहभागातून १ लाख ५४ हजार इतकी रक्कम जमवली. शिक्षकांनीही आपल्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी १ लाख इतके योगदान दिले, तर मुख्याध्यापकांनी स्वतः पुढाकार घेत १ लाख १० हजारांची भर घातली. पालकांचे प्रेम, समाजाची माणुसकी, शिक्षकांची तळमळ आणि मुख्याध्यापकांचे नेतृत्व या चारही स्तंभांनी मिळून या स्वप्नाला आधार दिला आणि तेच खरे या उपक्रमाचे सामर्थ्य ठरले.

माजी गटविकास अधिकारी डॉ. निलेश वानखडे, माजी विद्यार्थी पुरुषोत्तम चौधरी, साहेबराव चौधरी, यादवराव चौधरी, न्यायमूर्ती सतीश गोरे यांच्यासह विद्यमान गटविकास अधिकारी अक्षय भगत, शारदाबाई देशमुख, भिष्णूर आरोग्य केंद्रातील कर्मचारी वर्ग, विक्रीकर सहायक आयुक्त हिमांशू रेवतकर, मेजर सतीश घागरे, विनोदराव चौधरी अशा अनेक दातृत्वशील व्यक्तींनी या स्वप्नाला बळ दिले. कुणी शिक्षणाच्या ओढीने मदत केली, कुणी आपल्या मातीशी असलेल्या ऋणानुबंधातून पुढे आले, तर कुणी केवळ एक शिक्षकाच्या कार्यावर व शब्दावर विश्वास ठेवून हातभार लावला. आणि यातूनच हे सिद्ध झाले की 'एक विद्यार्थी, एक स्वप्न, एक संधी' ही केवळ घोषणा नसून एक जिवंत चळवळ बनू शकते.जिथे पैशांपेक्षा माणसांचे मन मोठे असते.

बंगळुरूमध्ये पाऊल ठेवताच या विद्यार्थ्यांसाठी जणू एक नवे जग उघडले. ६ आणि ७ सप्टेंबर या दोन दिवसांत त्यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्त्रो आणि हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एच.ए.एल.) या नामांकित संस्थांना भेट दिली. जिथे मोठमोठे उपग्रह, अवकाशयाने आणि विमाने तयार होतात, त्या जागी प्रत्यक्ष उभे राहून या ग्रामीण मुलांच्या मनात विज्ञानाबद्दलचे कुतूहल अधिकच जागृत झाले असावे. एखाद्या पुस्तकातील चित्रापेक्षा प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेले तंत्रज्ञान कितीतरी अधिक शिकवून जाते, आणि हीच खरी शिक्षणाची ताकद असते. नेहरू प्लॅनेटोरियममध्ये त्यांनी खगोलशास्त्राची ओळख करून घेतली, तर बोटॅनिकल गार्डन आणि पॅराडाइज अक्वेरियममधून पर्यावरण व जैवविविधतेचे धडे त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मिळाले. बंगळुरू पॅलेस आणि इस्कॉन मंदिराच्या भेटीने इतिहास, कला आणि संस्कृतीचा वारसाही त्यांच्यासमोर उलगडला. अशा प्रकारे विज्ञान, पर्यावरण, इतिहास आणि अध्यात्म यांचा मिलाफ एकाच सहलीत घडून आला, जो कोणत्याही वर्गखोलीत शिकवणे तसे कठीणच असते.

८ सप्टेंबरला रेल्वेने परतीचा प्रवास करत ही मुले पुन्हा आपल्या थूगाव (निपाणी) च्या मातीत परतली, मात्र परतली ती पूर्वीपेक्षा वेगळी होऊन. त्यांच्या डोळ्यांत आता नवी स्वप्ने उमटली होती, मनात नवा आत्मविश्वास निर्माण झाला होता आणि भविष्याकडे पाहण्याची एक व्यापक दृष्टी त्यांना लाभली होती.

ही घटना केवळ थूगाव (निपाणी) पुरती मर्यादित न राहता, संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्रासाठी एक आदर्श ठरावी अशी आहे. अनेकदा असे मानले जाते की दर्जेदार शिक्षण आणि उत्तम अनुभव हे केवळ शहरी मुलांच्याच वाट्याला येतात, आणि साधनांच्या अभावी ग्रामीण मुलांना असे अनुभव कधीच मिळू शकत नाहीत. पण थूगाव निपाणीच्या या उपक्रमाने हा समज पूर्णपणे खोडून काढला. ५ लाख ४४ हजारांसारखा मोठा खर्च एका छोट्याशा गावाने, कुठल्याही मोठ्या संस्थेच्या किंवा शासकीय मदतीशिवाय, केवळ आपल्या माणसांच्या बळावर उभा केला. हेच या प्रेरणादायी प्रवासाचे खरे सौंदर्य आहे. यासाठी गरज असते ती केवळ इच्छाशक्तीची, समाजातील माणसांनी एकत्र येण्याची आणि मुलांच्या भवितव्यावर विश्वास ठेवण्याची. शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी आणि गावातील प्रत्येक दानशूर व्यक्तीने दाखवलेली ही एकजूट हेच सिद्ध करते की समाजाने मनावर घेतले तर कोणतीही गोष्ट अशक्य राहत नाही.

आज या ४९ विद्यार्थ्यांच्या मनात रुजलेली विज्ञानाची बीजे आणि त्यांनी पाहिलेली मोठी स्वप्ने, उद्या कदाचित एखादा वैज्ञानिक, एखादा अभियंता किंवा एखादा प्रेरणादायी नेता घडवतील. आणि तेव्हा या एका शैक्षणिक सहलीचे महत्त्व अधिकच गडद होईल. थूगाव (निपाणी) ने घालून दिलेला हा आदर्श 'लोकसहभागातून शिक्षणाला मिळालेली भरारी' आहे. प्रत्येक गावाने आणि प्रत्येक समाजाने ही प्रेरणा आत्मसात करावी अशीच आहे.कारण अखेर प्रत्येक मुलाच्या डोळ्यांतील स्वप्न साकार करणे हीच खरी सामाजिक जबाबदारी ठरते.

- ९१४५७७९०५०

# देव जरी मज, कधी भेटला...!

वृषाली वानखडे
अमरावती

आईच्या शिस्तप्रिय संस्कारात मोठं होत असतांना आयुष्य उमजत गेलंय.... आई-बाबा आदर्श शिक्षक.... आणि शाळा त्यांच्यासाठी विद्यामंदिर... प्रत्येक विद्यार्थी योग्य घडविणे हेच त्यांचे ध्येय.... आई -- बाबांचा संघर्ष बघत आम्ही तिन्ही भावंड लहाण्याचे मोठं झालोय.... रात्री अभ्यास झाला की निवांत आईच्या मांडीवर डोकं ठेऊन आईच्या मधाळ स्वरात..."देव जरी मज, कधी भेटला... माग हवे ते माग म्हणाला..... म्हणेल प्रभू रे.. माझे सारे... जीवन देई मम बाळाला..."हे गीत ऐकत कधी झोप लागायची हे कळायचं पण नाही.... घरातील सकाळ - संध्याकाळचं वातावरण अभ्यासाचं. ताई आणि दादा फार अभ्यासू. मी छोटी लाडोबा. अर्थातच घरात लाडाची. मात्र सामंजस वृत्ती. घरी आजीबद्दल आदर, ममत्व...आई -बाबांच्या संस्कारातून सहज उमजलं..... घरात अखंड हसतं -खेळतं वातावरण असलं तरी शिस्तप्रियता फार होती.... आई -बाबांची अतिशय कर्तव्यदक्षतेची नोकरी. त्यांची धावपळ बघूनच आम्ही सर्वजण स्वतःची कामे स्वतः करायला शिकलोय... त्यांच्या प्रभावी जीवनशैलीने प्रत्येक विद्यार्थ्यांना जगणं शिकवलंय...हट्टी पणा, अल्लडपणा अंगी स्पर्शला नाहीच... त्यांची समजावून सांगण्याची कला फार शैक्षणिक होती.

त्यांच्यातील सकारात्मकता सहज आत्मसात करता आली.... आमच्या आवडीनुसार असंख्य बालकथा पुस्तके घरी यायचे. ज्यांना जी आवड तसे सामग्री बाबा आणायचे. घरी असंख्य विद्यार्थी अभ्यासाला यायचे. सोबतच नात्यातील अनेक मंडळी घरी शिकायला होती. तेव्हा हायस्कुल आणि बोर्ड परीक्षा गावात असायच्या....त्यातच आम्ही लहानाचे मोठे होत गेलोय..म्हणूनच शहाणपण लवकर गवसलं....आणि आई जे गीत गायची त्या गीतातील अर्थसुद्धा तेव्हाच उमजला.....

आई कोणतीही असो... देवाकडे स्वतःचं आयुष्य लेकराला मिळू दे... हेच मागणं करणार.....

प्रत्येक घरात मुलं आई -बाबांच्या तालमीत वाढत असतात. आई -बाबा, आजी -आजोबा मुलांना जगण्याचा मार्ग दाखवतात. कुठल्याही परिस्थितीचा सारासार विचार करायला शिकवतात.. वेळेवर उद्भवलेल्या परिस्थितीतून योग्य मार्ग काढायला शिकवतात.... म्हणूनच घराघरात जेष्ठ आजी - -आजोबा असणे काळाची गरज आहे..त्यांच्यामुळे घराला घरपण राहतं.... घराचा देव्हारा होतो....

आई-बाबांचे, आजी-आजोबांचे संस्कार शेवटच्या श्वासापर्यंत सोबत असतात हेच खरे......

आजच्या युगात कित्येक घराघरात ज्वलंत प्रश्न आहे. हायपर अँक्टिव्ह मुलं (वयाच्या २ वर्षानंतर ही स्थिती )...त्यांच्या मनाविरुद्ध काही घडले की हातात जी वस्तू असेल ते फेकणे, कारण नसतांना किंचाळने, समोरच्या कोणत्याही व्यक्तीला लोटून देणे, मनात येईल तसं वागणे.....जेष्ठ व्यक्तींना उलट उत्तर देणे, घरात कुणी जर रागावले तर जोरात रडणे.....

अनेकदा अशा विध्वंसक वृत्तीच्या मुलांचे पालक मी बोलतांना बघितले.... की, " आजकालची मुलं भयंकर स्मार्ट आहेत, यांना जेवण करतांना मोबाईल लागतो... टीव्ही गेम्स तर हवाच.. त्यांना शाळेच्या होमवर्कमुळे फार ताण येतोय, हायपर अँक्टिव्हीला अँक्टिव्हीटी तर हवीच...! ".....

अगदी लहान मुलांची दृष्टी तितकी विकसित नसल्याने ऐकण्यावरच त्यांचा ज्ञान मिळवण्याचा कल असतो. म्हणूनच घरातील जेष्ठ व्यक्तींनी (विशेष म्हणजे कर्तव्यदक्षतेची नोकरी सांभाळणाऱ्या पालकांनी) मुलांना जितका वेळ देता येईल तितका द्यावाच....सोबतच घरातील वातावरण पोषक असणे आवश्यक... याच काळात मुलांची शारीरिक -मानसिक वाढ होत असते. अर्थातच अशा त्रासदायी मुलांच्या सोबत आपल्या मेंदूची झिज होत असते.... कुठल्याही परिस्थितीत मुलांना अँक्टिव्हीटी सप्लाय करणे म्हणजेच अँक्टिव्हीटी निर्माण करणे हे प्रत्येक पालकांचे कर्तव्य आहे. कधी कधी परिस्थितीनुसार पालक दमून घरी येतात....

मुलांच्या तक्रारी घरी असणारे आजी-आजोबा मुलांच्या पालकांजवळ करतात. तेव्हा मुलांना संयमाने पटवून द्यायचं कार्य पालकांचेच आहे.. काही पालक उलट बोलतांना आढळतात.."अजून लहान आहे, हातातील वस्तू फेकायची नाही, जोरात ओरडायचं नाही, मोठ्यांसोबत कसं राहायचं... हे कसं कळणार तिला?"... पालकांच्या याच चुकीच्या बोलण्याने मुलं विध्वंसक वृत्तीचे बनतात..आपण अनुभवतोय... आपल्या शेजारी किंवा नात्यात एकटी आजी किंवा आजोबा लेकरांना सांभाळतात..कारण नासमज मुलांच्या सानिध्यात राहून त्याला नीट सांभाळणे फार अवघड कार्य आणि जबाबदारी आहे... हे आजी -आजोबांनाच माहीत....

बालपणापासून पाच -सहा वर्षे तुम्ही मुलांना ज्या पद्धतीने घडवता त्याचप्रमाणे त्यांची पुढच्या आयुष्याची बुद्धी बनते. आपण मात्र निकोप खतपाणी घालत राहायचं...मुलांच्या पोषक आहारविषयी आईचंच विशेष लक्ष हवंय... काही मुलं बाहेरचे खाण्यासाठी हट्ट धरून असतात.. तेव्हा आईच मुलांना समजावून सांगू शकते... आणि मुलांच्या आवडीचे पोषक पदार्थ घरी बनवून त्या मुलांची बौद्धिक क्षमता लक्ष्यात घेऊन समजावून सांगायला हवे...आईने वेळेच्या नियोजनातून मुलांच्या आवडीचे रंग, आकार, स्वरूप, चवीनुसार पदार्थ बनवावेत.... तेव्हाच मुलं बाहेरच्या खाण्यापासून दूर राहतील..... सोबतच मुलांना आवड निर्माण होणारे पेंटिंग्ज, बुद्धीला चालना देणारे खेळ, बडबडगीत, बालगीत वाचन, नृत्य, बालकथा पुस्तके, हस्ताक्षर बुक्स, घरी तयार करता येईल असा मुलांचा सामूहिक प्रोजेक्ट यावर पालकांनी स्वतः लक्ष देणे फार गरजेचे....

जे मनाला आवडतं तेच काही जिद्दी मुलं करत बसतात.. म्हणूनच पालकांना फार सतर्कता ठेवावी लागते.. मुलांच्या वयाशी एकरूप होऊन काय योग्य काय अयोग्य... याचं शिक्षण देणे अती महत्वाचे....शाळेतील मुलांची प्रगती नुसार आजकाल एक्स्ट्रा शिकवणी वर्ग सुरु असतात. समाजात दररोज होणाऱ्या घटना लक्ष्यात घेता मुलांना जवळ बसवून, एखादे पटेल असे उदाहरण देऊन त्यांना सतर्क करावे...

सर्वच मुलं पालकांचं, आजी -आजोबांचं न ऐकणारी नसतात.... आपल्याच नात्यातील नाण्याच्या दोन्ही बाजू आम्ही बघत आहोत.... काही मुलं बालपणापासूनच फार शांत, आदर्श, समजदार असतात.. काही आपल्याला अनुभवात्मक आपल्याच लेकरांचे उदाहरण असते.... घरात लाड पुरवायला कोणीही नसतं, बालवयात आलेल्या जबाबदाऱ्या स्वीकारून, घरातील वातावरण (परिस्थिती ) बघून मुलं फार सद्गुणी,समजदार होतात.... अतिशय संघषार्तून मोठी होणारी मुलं पुढेही फार तडजोड करीत जगतात....आणि स्वतःचं स्वतंत्र अस्तित्व निर्माण करतात. म्हणूनच आई -बाबांच्या शिस्तप्रिय संस्काराने आपलं विशेष व्यक्तिमत्व उजळून निघत असते. नक्कीच समाजाच्या गतीप्रमाणे चालावे..... मात्र आपल्या संस्काराने चारही दिशा दिप्तमय व्हाव्यात.

# जागतिक शांती : विश्वभरात युद्ध संघर्ष आणि हिंसा टाळा

श्रीकृष्णदास (बापू)
निरंकारी, गडचिरोली

आंतरराष्ट्रीय शांतता दिन हा दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस जगभरातील शांतता, अहिंसा आणि एकात्मतेसाठी समर्पित आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने १९८१ साली हा दिवस शांततेच्या महत्त्वावर जागतिक पातळीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्थापन केला होता. युद्ध, संघर्ष आणि हिंसेच्या पार्श्वभूमीवर, या दिवशी लोक एकत्र येऊन शांततेच्या विचारांचे समर्थन करतात.

शांततेचा प्रसार, संवाद आणि समन्वय वाढवण्याचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्दिष्टाने विविध उपक्रम, चर्चासत्रे आणि कार्यक्रम योजले जातात. या दिवसाचे एक मुख्य उद्दिष्ट म्हणजे मानवजातीने एकमेकांशी संवाद साधून आणि मतभेद सोडवून शांततेच्या दिशेने पावले उचलणे. विश्वशांती दिवसाच्या निमित्ताने लोक एकत्र येऊन समाजातील हिंसेचे निर्मूलन कसे करता येईल, यावर चर्चा करतात आणि शांततेच्या दिशेने कार्य करण्याची प्रतिज्ञा घेतात. विश्वव्यापी संत निरंकारी मिशन ही जागतिक पातळीवर विश्वशांती, मानवता आणि सार्वत्रिक बंधुभाव वाढवण्यासाठी कार्य करणारी एक महत्त्वाची आध्यात्मिक संस्था आहे. या मिशनचे मुख्य ध्येय "निराकार-परमेश्वरा"ची ओळख करून देऊन मानवी मनात शांतता निर्माण करणे हे आहे, कारण मिशनचे मानणे आहे की "भिंती विरहित जग- World without walls" केवळ आध्यात्मिक जागृतीतूनच शक्य आहे.

विश्वशांती (जागतिक शांतता) म्हणजे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे, समाज आणि मानवांमध्ये हिंसाचार, युद्ध आणि भीतीचा अभाव असणारी एक आदर्श स्थिती होय. ज्या ठिकाणी शांतता असते, तिथेच बंधुभाव, विकास आणि मानवी कल्याण शक्य होते. विश्वशांती संकल्पनेची सविस्तर माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेऊया:

**१. आंतरराष्ट्रीय शांतता दिन** जागतिक स्तरावर शांततेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेद्वारे दरवर्षी २१ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय शांतता दिन म्हणून साजरा केला जातो. २. **इतिहासः** या दिवसाची सुरुवात सन १९८१ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या ठरावाने झाली. सन १९८२ पासून हा दिवस अधिकृतपणे साजरा करण्यास सुरुवात झाली.

**३.उद्देशः** जगातील सर्व देशांमधील संघर्ष संपवणे, युद्धविराम पाळणे आणि अहिंसेचा प्रसार करणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. **४.भारताचे** योगदान आणि 'पंचशील' तत्त्वेविश्वशांतीच्या बाबतीत भारताचा इतिहास नेहमीच मार्गदर्शकाचा राहिला आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जागतिक शांततेसाठी "पंचशील" (५ मूलभूत तत्त्वे) मांडली होती: एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर करणे. एकमेकांवर आक्रमण न करणे. एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे. समता आणि परस्परांचा लाभ लक्षात घेणे. शांततापूर्ण सहअस्तित्व राखणे. विश्वशांतीची आवश्यकता का आहे? मानवी कल्याणः युद्ध आणि हिंसाचारामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होते. शांततेमुळेच नागरिकांना सुरक्षित जीवन जगता येते. आर्थिक आणि सामाजिक विकासः ज्या देशांमध्ये शांतता असते, तिथे शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होतो. अण्वस्त्र नियंत्रणः आजच्या काळात अनेक देशांकडे विनाशकारी अण्वस्त्रे आहेत. जागतिक शांतता टिकवून ठेवण्यासाठी अण्वस्त्रांचे निःशस्त्रीकरण आवश्यक आहे. विश्वशांती समोरील मुख्य आव्हाने-

**दहशतवादः** आज आशिया खंडासह संपूर्ण जगाला दहशतवादाने ग्रासले आहे. **साम्राज्यवाद आणि सीमावादः** देशादेशांमधील सीमारेषेवरून होणारे वाद (उदा. रशिया-युक्रेन किंवा इस्त्रायल-गाझा संघर्ष) हे जागतिक शांततेला मोठा धोका निर्माण करतात.

- ९६९९८३६७१७

थोडक्यात

## सामुदायिक प्रार्थना सर्वांच्या सुखासाठी आहे : ग्रामगीताचार्य नारायण कवठकर



**दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपुर**

आजच्या काळात मनुष्य स्वार्थी व आत्मकेंद्रित झाला समाजात राहून समाजाचा किंचितही विचार करत नाही केलीच तर वैयक्तिक प्रार्थना करतो त्यात स्वार्थ दडलेला असून स्वतःचा विचार असतो संतांनी विश्वाचे सुख मागितले सामुदायिक प्रार्थना ही सर्वांच्या सुखासाठी असून विश्वाला शांती व सुख लाभण्याचे प्रभावी साधन आहे असे प्रतिपादन ग्रामगीतचार्य नारायण कवठकर यांनी केले. गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी ५१ सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून गुरुवार २४ सप्टेंबर रोजी उत्कृष्ट खंजिरी वादक सुरेश कदम यांच्या निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली यावेळी तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे, राष्ट्रीय कीर्तनकार प्रा. आकाश ताविडे,डॉ.शरद राऊत, कासार समाजभूषण मोहन नागपूरकर,भीमराव वानखडे, जितेंद्र किन्हेकर, गजानन चव्हाण, विठ्ठल यावले मंडळाचे अध्यक्ष गणेश धमाळे प्रामुख्याने उपस्थित होते.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून गणपती बाप्पा चे पूजन व संत गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. ग्रामगीताचार्य स्मिता धमाळे यांच्या आदेशावरून शिस्तबद्ध,गांभीर्यपूर्ण सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली.

यावेळी प्रार्थनेचे महत्व विषद करतांना कवठकर पुढे म्हणाले की सद्गुरू वामनराव पै हेच सांगतात इतरांच्या सुखात आपले सुख लपलेले आहे तर इतरांच्या दुःखात आपले दुःख दडलेले आहे,इतरांना सुख द्याल तर सुख तुमच्या घरी पाणी भरेल,इतरांना दुःख द्याल तर तेच दुःख तुमच्या डोळ्यातून पाणी काढेल कारण निसगार्चा नियम आहे क्रिया तशी प्रतिक्रिया, काही लोक स्वतःस धार्मिक समजतात पण दैनंदीन जीवनात खोटे व्यवहार करतात, कर्मकांड करण्यात धार्मिकता नसून माणुसकी जपण्यात धार्मिकता आहे आणि ही प्रार्थना मानव्य शिक्षणाची शाळा आहे कारण राष्ट्रसंतांनी माणसात देव जाणला यावेळी त्यांनी राष्ट्रसंतांच्या भजनाच्या आधारे अनमोल मार्गदर्शन केले.

त्यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला हार्मोनियम अशोक भगत महाराज, माधव पवार यशवंत भगत यांनी तर तबला अनिल अस्वार, किसन गरडे, साहेबराव सरकटे यांनी खंजिरी सुरेश कदम,प्रा. आकाश ताविडे यांनी साथसंगत कैलास मस्के,पुंडलिक भालेराव, अरुण इंगळे, श्यामराव देशमाने, गजानन गव्हाणकर, निळकंठ घाटगे, सुभाष जाधव,विनोद पवार,रमेश चव्हाण, तानाजी गडधने माधव गव्हाणे सतीश चव्हाण दिगंबर चव्हाण मुंगशी चव्हाण सुधाकर कपटे महिला प्रतिनिधी रंजना किन्हेकर, मीरा वानखडे, मुक्ता काळबांडे,विद्या पुरी,डॉ देवश्री काळबांडे,मोना जयस्वाल, सावित्रीबाई फुले महिला भजनी मंडळ अध्यक्षा आशा माने,विमल यादव, संगीता जाधव यांनी केली. महाआरती,राष्ट्रवंदना,जयघोष घेण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेश कदम,लता कदम, रवींद्र कदम, पूजा कदम राजेश कदम तसेच शिवन्या,पूर्वा व सक्षम यांनी अथक परिश्रम घेतले महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली..

## पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना महावितरणचे अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ज्येष्ठ राजकारणी, अखंड मानवतावाद (एकात्म मानववाद) विचारसरणीचे समर्थक, लेखक, पत्रकार व संघटक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे. त्यांना अभिवादन करण्यात आले. महावितरण नागपुर परिमंडलाच्या काटोल मार्गावरील विद्युत भवन या प्रशासकीय मुख्यालयात मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. यावेळी अधीक्षक अमित परांजपे, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता अमित शिवलकर, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर, यांसह अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना आदराने अभिवादन केले.

## ग्रामपंचायत नयाकुंडमध्ये रमादासजी रामटेकेतर्फे मियांवाकी पद्धतीने वृक्षलागवड



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

ग्राम पंचायत नयाकुंड येथे दानवीर रमादासजी रामटेके तर्फे गटविकास अधिकारी सुभाष जाधव यांच्या हस्ते अवग्रामध्या अर्ध्या मिनिटांत एक आर जागेमध्ये मियांवाकी पद्धतीने ४०० वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच रामटेकेतर्फे जमिनीची पाणी पातळी वाढवण्या करीता गावच्या हद्दी मध्ये कोल्हापुरी बंधारा बांधून उउऊचे काम करण्यात आले. त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी उपस्थित मान्यवराचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन सरपंच सुधीर अवस्थी यांनी केले. आभार प्रदर्शन ग्रा. प अधिकारी प्रियंका बोरकर यांनी केले कार्यक्रमाला आवर्जून विस्तार अधिकारी प्रभाकर वाघ, विस्तार अधिकारी बोंद्रे मॅडम, प्रतिमा रामटेके, व संपुर्ण रामटेके परिवार अनिता ठाकरे ग्रा. प सदस्या, सर्व कर्मचारी व ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाऊ समर्थ स्मृती शताब्दी ग्रंथ संपादक म्हणून प्रदीप पवार यांची निवड

### मान्यवरांचे संपादक मंडळ नियुक्त, चित्रकला महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राची तयारी सुरू, महानगरपालिकेने भाऊंचे म्युरल करावे यासाठी पाठपुरावा, सुरेश भट सभागृहात भाऊंची चित्रं कायम प्रदर्शित राहणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे,दिवंगत नागपूरकर चित्रकार भाऊ समर्थ यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने समितीतर्फे प्रकाशित करण्यात येणार असलेल्या भाऊ समर्थ स्मृती शताब्दी ग्रंथाचे संपादक म्हणून प्रदीप पवार यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या मदतीसाठी नेमण्यात आलेल्या संपादक मंडळात डॉ राजेंद्र पटोरीया, डॉ प्राची समर्थ, डॉ. केशव भांडारकर, संजय भलमे, चंद्रकांत चन्ने,प्रा विकास जोशी या मान्यवरांचा समावेश आहे.ज्येष्ठ पत्रकार, संपादक प्रवीण बदार्पूरकर हे संपादक मंडळ मार्गदर्शक असतील.



डावीकडून : चंद्रकांत चन्ने, प्रा. विकास जोशी, प्रदीप पवार, संजय भलमे, डॉ. प्राची समर्थ, डॉ. शरद निंबाळकर, डॉ. केशव भांडारकर, समिती अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, सह अध्यक्ष डॉ. विश्वनाथ साबळे आणि माजी आमदार, चित्रकार दीनानाथ पडोळे

बुधवारी शासकीय चित्रकला महाविद्यालयात झालेल्या समितीच्या सभेत हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी दिली.

भाऊ समर्थ यांचे 'नागपूर हीरोज' मालिकेत म्युरल महानगरपालिकेने करण्यासाठी महापौर व आयुक्त यांचेकडे पाठपुरावा सुरू असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच नागपुरातील सर्व आमदार यांनी देखील नागपूर महानगरपालिकेकडे यासाठी आग्रह धरावा अशी विनंती समितीच्या वतीने त्यांना पत्र लिहून करण्यात आली असल्याचे डॉ. जोशी यांनी सांगितले.

सभेला डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या शिवाय डॉ विश्वनाथ साबळे, चंद्रकांत चन्ने,प्रा. विकास जोशी, डॉ. प्राची समर्थ, दीनानाथ पडोळे, डॉ. केशव भांडारकर, डॉ. शरद निंबाळकर,धर्मेश पराते,संजय भलमे, प्रदीप पवार हे उपस्थित होते. नितीन गडकरी यांनी सुरेश भट सभागृहात भाऊंची काही चित्रं कायम प्रदर्शित करण्याची जी सूचना समितीला केली,त्या दृष्टीने चित्रांची निवड व पुढील प्रक्रिया,प्रदीप पवार, चंद्रकांत चन्ने, विकास जोशी हे नानू नेवरे यांचे सहकार्य घेऊन करत असल्याचे सांगण्यात आले.

राष्ट्रीय कार्यशाळा व चित्रप्रदर्शनाची जबाबदारी शासकीय चित्रकला महाविद्यालयाचे अधिष्ठाता व समितीचे सह अध्यक्ष डॉ विश्वनाथ साबळे आणि चित्रकार चंद्रकांत चन्ने,प्रा विकास जोशी यांनी घेतलेली असून लवकरच त्याची रूपरेषा उपलब्ध होईल असे डॉ. साबळे म्हणाले.

सभेदरम्यान पंजाबराव कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ शरद निंबाळकर यांनी समितीला ११०००/- रूपयांची देणगी धनादेशाद्वारे दिली. त्याचे स्वागत करण्यात आले. प्रवीण बर्दापूरकर, चंद्रकांत चन्ने, धर्मेश पराते, दीनानाथ पडोळे यांनी देखील प्रत्येकी पाच हजार रुपये देणगी दिली.

नागपूरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवणाऱ्या, नागपूर, विदभार्ला भूषणावह असणाऱ्या चित्रकार भाऊ समर्थ यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने वर्षभर विविध उपक्रम करण्यात येणार असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरज आहे व त्यासाठी देणग्या सर्व कलाप्रेमींनी ९९२३३५२६९५ या गुगल पे नंबरवर व धनादेशाद्वारे द्यायचे झाल्यास भाऊ समर्थ जन्मशताब्दी समिती या नावाने, कार्याध्यक्ष डॉ. केशव भांडारकर यांना ९८२३२९७७५० या क्रमांकावर संपर्क साधून द्याव्या असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'सेवा सेतू' व 'सेवा संकल्प अभियाना'त महावितरणच्या सर्व सेवा एकाच छताखाली,




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वीजग्राहकांना अधिक वेगवान, पारदर्शक आणि सुलभ सेवा पुरवण्यासाठी महावितरणने राज्यभरात एकाच वेळी सुरू केलेल्या 'सेवा सेतू' आणि 'सेवा संकल्प अभियाना'ला नागपूर परिमंडलात मोठा प्रतिसाद मिळत आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष उभारण्यात आले असून, येत्या १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या वीज आणि सौर सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या संपूर्ण अभियानाच्या प्रगतीचा आणि अंमलबजावणीचा सविस्तर आढावा महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी नागपूर येथे आयोजित बैठकीत घेतला.

मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार, १७ सप्टेंबरपासून या दोन्ही

### संचालक राजेंद्र पवार यांनी घेतला आढावा

अभियानांना राज्यभरात धडाक्यात सुरुवात झाली आहे. या अभियानाची गती आणि व्याप्ती आणखी वाढवण्याचे निर्देश देत संचालक राजेंद्र पवार यांनी बैठकीदरम्यान एक महत्त्वाची घोषणा केली. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरी आणि ग्रामीण भागातील प्रत्येकी दोन सर्वोत्कृष्ट मंडळांचा विशेष गौरव करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सेवा संकल्प अभियाना अंतर्गत प्रत्येक तालुक्यात सुरू करण्यात आलेल्या विशेष सेवा कक्षांद्वारे पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० यांसारख्या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनांचा प्रसार केला जात आहे. या कक्षांमध्ये ग्राहकांना ऑनलाईन अर्ज नोंदणी, योजनेचे आर्थिक फायदे, सौर संच बसवण्याची प्रक्रिया तसेच आवश्यक कागदपत्रे याविषयीचे मार्गदर्शन थेट जागेवरच दिले जात आहे. विशेष म्हणजे कर्जाची सोय सुलभ व्हावी म्हणून स्थानिक बँक प्रतिनिधी आणि निवडसूचीवरील सौर कंत्राटदार प्रतिनिधींशी थेट संपर्क व समन्वयाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून, अर्जामधील तांत्रिक त्रुटींची त्वरित पूर्तता करून प्रलंबित अर्जांवर तात्काळ कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश या वेळी देण्यात आले.

दुसऱ्या बाजूला सेवा सेतू अभियानाद्वारे ग्राहकांच्या दैनंदिन वीजविषयक प्रश्नांचा निपटारा केला जात आहे. यामध्ये नवीन घरगुती वीजजोडणी देणे, नादुरुस्त रोहित्र विनाविलंब बदलून देणे, वीज बिलावरील नावात बदल करणे, मंजूर भार बदलणे आणि बिलिंगविषयक तक्रारींचे जागेवरच निवारण करणे यांसारख्या कामांना गती देण्यात आली आहे. याशिवाय विद्युत सुरक्षेच्या दृष्टीने वीज यंत्रणेमध्ये आवश्यकतेनुसार स्पेसर बसवणे, तांत्रिक उपाययोजना करणे आणि वीजयंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे या कामांना प्राधान्य दिले जात आहे. एकाच छताखाली सर्व सुविधा उपलब्ध झाल्यामुळे महावितरणच्या दालनात येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला अखंड आणि समाधानकारक सेवा मिळेल याची खात्री बाळगण्याचे निर्देश संचालक पवार यांनी दिले.

या आढावा बैठकीला नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, नागपूर ग्रामीणचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, नागपूर शहरचे अधीक्षक अभियंता प्रफुल्ल लांडे, वर्ध्याच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी, अधीक्षक अभियंता (इन्फ्रा) दिपाली माडेलवार यांच्यासह नागपूर व वर्धा मंडळातील सर्व कार्यकारी अभियंता आणि प्रादेशिक व परिमंडल कार्यालयातील विभाग प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## होम ऑटोमेशन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकतीच नबिरा महाविद्यालय, काटोल येथे वेगाने विकसित होत असलेल्या ऑटोमेशन आणि स्मार्ट तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान व उद्योगाभिमुख कौशल्ये प्राप्त व्हावीत, या उद्देशाने होम ऑटोमेशन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा इलेक्ट्रॉनिक्स, भौतिकशास्त्र, गणित आणि संगणकशास्त्र विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत होम ऑटोमेशन, इंटरनेट ऑफ थिंग्ज, स्मार्ट उपकरणे, सेन्सर्स, एम्बेडेड सिस्टिम्स आणि ऑटोमेशन तंत्रज्ञान यांची मूलभूत संकल्पना, विविध उपयोग तसेच भविष्यातील संधी यांची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली. कार्यशाळेच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. नवीण यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यशाळेतील तांत्रिक सत्रे एकदृष्टा आयटी सोल्युशन्सचे संचालक जयदेव पेंडसे यांनी घेतली. त्यांनी होम ऑटोमेशनच्या विविध संकल्पना, तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष उपयोग याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच ऑटोमेशन उद्योगातील करिअरच्या विविध संधींबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी इलेक्ट्रॉनिक्स, भौतिकशास्त्र, गणित आणि संगणकशास्त्र विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यशाळेचे आयोजन यशस्वीरीत्या पार पडले.

## २९ सप्टेंबर रोजी 'शौर्य दिना'चे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय सैन्याची अभिमानास्पद कामगिरी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि माजी सैनिकांचा गौरव करण्यासाठी राज्य शासनाने २९ सप्टेंबर २०२६ रोजी (मंगळवार) शौर्य दिन साजरा करण्याचे निश्चित केले आहे. शौर्य दिनाचा कार्यक्रम दि २९ रोजी सकाळी ९.४५ वाजता नागपूर येथील सिव्हिल लाइन्स परिसरातील हिस्लॉप महाविद्यालयासमोर माजी सैनिक मुलींचे वसतिगृह परिसरात आयोजित करण्यात आला आहे.

# इनरव्हील क्लब ऑफ नागपूर व सेकंड बिगिनिंगतर्फे कुकरी स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनरव्हील क्लब ऑफ नागपूर, डिस्ट्रिक्ट ३०३ यांच्यावतीने सेकंड बिगिनिंग यांच्या सहकायार्ने प्रेस क्लब, नागपूर येथे उत्साहपूर्ण व सर्वसमावेशक कुकरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महिला, विद्यार्थी तसेच दिव्यांग किशोरवयीन मुला-मुलींना आपल्या पाककला कौशल्याला, सर्जनशीलतेला आणि कल्पकतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत मोडक, कॉर्न आणि मिलेट्स अशा तीन गटांचा समावेश होता. सुमारे ५० लाभार्थींनी या उपक्रमात सहभाग घेतला.



स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या वृंदा ठाकरे यांच्या हस्ते झाले. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सहभागी स्पर्धकांना आपल्या पाककला कौशल्यासोबतच नावीन्यपूर्ण, पौष्टिक आणि आरोग्यदायी पदार्थ तयार करण्यासाठी प्रोत्साहित केले. स्पर्धकांनी विविध प्रकारचे आकर्षक, नावीन्यपूर्ण आणि पौष्टिक पदार्थ सादर केले. पदार्थांची निवड चव, सजावट, सर्जनशीलता, पौष्टिकता आणि एकूण सादरीकरण या निकषांवर करण्यात आली.

**विजेते स्पर्धक**

**मिलेट्स गट**

प्रथम क्रमांक - सुरेखा चौधरी
द्वितीय क्रमांक - श्रेया मुखर्जी
तृतीय क्रमांक - रोहिणी देशकर

**मोडक गट**

प्रथम क्रमांक - कृतिका जैन, एल.ए.डी. कॉलेज
द्वितीय क्रमांक - नेहा वाणी
तृतीय क्रमांक - आस्था

**कॉर्न गट**

प्रथम क्रमांक - रिंकू घोष
द्वितीय क्रमांक - श्रेया घोषाल
तृतीय क्रमांक - अंशु शुक्ला

स्पर्धेचे परीक्षण पूनम राठी, विशाल चव्हाणे, नीरजा जैन, डॉ. नंदिता साप्रा आणि उर्वशी यांनी केले.

या उपक्रमासाठी प्रकल्प संचालक डॉ. हर्षा झारिया यांनी विशेष पुढाकार घेतला. इनरव्हील क्लब ऑफ नागपूरच्या शर्मिला आनंद, रोहिणी करकर, लक्ष्मी झा, अंशु शुक्ला, डॉ. हर्षा झारिया, अनुजा महाजन आणि नीता पुनियानी या सदस्यांची उपस्थिती व सक्रिय सहभाग लाभला. इनरव्हील क्लब ऑफ नागपूरच्या अध्यक्षा डॉ. पूजा साओजी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

या स्पर्धेच्या माध्यमातून पाककला, सर्जनशीलता, आरोग्यदायी आहार, पौष्टिकता आणि समावेशकतेचा संदेश देण्यात आला. दिव्यांग किशोरवयीन मुला-मुलींना सहभागी करून त्यांना आपले कौशल्य आणि क्षमता सादर करण्याची संधी देण्यात आली. सर्व सहभागींचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि उत्साह यामुळे हा उपक्रम यशस्वी व संस्मरणीय ठरला.

